महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरूद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन : मुंबईसह एकाच वेळी प्रसारित ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, जालना, नाशिक

MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

www.maharashtracrimetimes.com | epaper.maharashtracrimetimes.com

मूल्य ₹ २/-

● संपादक : राकेश शंकर गोरे ● वर्ष : १७ अंक : १८ पृष्ठ : ८ मुंबई, मंगळवार ०४ ऑगस्ट २०२६ ते सोमवार १० ऑगस्ट २०२६ ● POSTAL REG.NO. MCN/157/2026-2028 ● PRGI. REG. NO. MAHMAR/2010/33301

सुनेत्रा पवारांना निवडणूक आयोगाच्या सूचना!

# राष्ट्रवादीच्या घटनेतील दुरुस्तीची कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश




**■ मुंबई (विशाल कारंडे) : राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांना भारत निवडणूक आयोगाने पक्षाच्या संविधानातील दुरुस्त्यांबाबत महत्त्वाचे पत्र पाठवले आहे. २७ जुलै २०२६ रोजी पाठविण्यात आलेल्या या पत्रात पक्षाच्या घटनेतील काही बदलांना मंजुरी देणारे ठराव आणि संबंधित कागदपत्रे आयोगाकडे सादर करण्यात आलेली नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित दुरुस्त्यांच्या समर्थनार्थ आवश्यक कागदपत्रे आणि वैध ठराव तातडीने सादर करण्याच्या सूचना आयोगाने दिल्या आहेत.**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर २६ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक झाली होती. या बैठकीत सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा म्हणून निवड करण्यात आली. त्यानंतर पक्षाच्या संविधानात काही दुरुस्त्या करण्यात आल्याची माहिती निवडणूक आयोगाला देण्यात आली होती. मात्र, आयोगाच्या छाननीत या बदलांशी संबंधित सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले. निवडणूक आयोगाच्या पत्रानुसार, २६ फेब्रुवारीच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या ठरावामध्ये केवळ कलम १८(१) मध्ये बदल करण्याचा उल्लेख आहे. मात्र, त्यानंतर आयोगाला पाठविण्यात आलेल्या पत्रांमध्ये कलम ६, ७, १२, ३२ आणि ३६ मध्येही दुरुस्ती करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. या अतिरिक्त दुरुस्त्यांना मंजुरी देणारे अधिकृत ठराव किंवा त्यासंबंधीची कागदपत्रे आयोगाकडे उपलब्ध नसल्याचे पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. सुनेत्रा पवार यांनी १० मार्च २०२६ आणि ७ एप्रिल २०२६ रोजी आयोगाला पाठविलेल्या पत्रांमध्ये पक्षाच्या संविधानातील कलम ६, ७, १२, १८(१), ३२ आणि ३६ मध्ये बदल झाल्याची माहिती दिली होती. मात्र, त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्ये केवळ कलम १८(१) संदर्भातील राष्ट्रीय कार्यकारिणीच्या ठरावाचा समावेश असल्याचे आयोगाने नमूद केले आहे. त्यामुळे उर्वरित कलमांमधील दुरुस्त्यांना मंजुरी देणारे ठराव, बैठकीची नोंद आणि इतर आवश्यक कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. निवडणूक आयोगाने आपल्या पत्रात पक्षाच्या संविधानातील कोणताही बदल अधिकृत ठराव आणि नियमांनुसार मंजूर झाल्याचे पुरावे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे. संबंधित कागदपत्रांशिवाय या दुरुस्त्यांची नोंद आयोगाच्या अभिलेखात स्वीकारता येणार नसल्याचेही आयोगाने नमूद केले आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसकडून आयोगाच्या पत्राला काय उत्तर दिले जाते, आवश्यक कागदपत्रे किती लवकर सादर केली जातात आणि त्यानंतर आयोग कोणती भूमिका घेतो, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

▸ पान २ वर

राज्यात 'धर्मस्वातंत्र्य कायद्या'ची अंमलबजावणी सुरू!

# बेकायदेशीर धर्मांतराला बसणार चाप



**■ मुंबई (राकेश गायकवाड) :** राज्यात अमिष, फसवणूक किंवा बळजबरीने धर्मांतर घडवून आणणाऱ्यांविरोधात आता कठोर कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे. विधिमंडळात संमत झालेल्या महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयकाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजुरी दिल्यानंतर हा कायदा राज्यात लागू झाला आहे. ३० जुलै रोजी राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. प्रलोभन, फसवणूक किंवा बळजबरीच्या माध्यमातून होणाऱ्या बेकायदेशीर धर्मांतरापासून नागरिकांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने हा कायदा केला आहे. राज्यात लव्ह जिहाद तसेच ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये प्रलोभने दाखवून धर्मांतर घडवून आणल्याच्या घटना समोर आल्यानंतर कठोर कायद्याची मागणी सातत्याने होत होती. त्यानुसार विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मार्च महिन्यात हे विधेयक मंजूर करण्यात आले होते. त्यानंतर राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आलेल्या या विधेयकाला आता अंतिम मान्यता मिळाली आहे. या कायद्यानुसार कोणतीही व्यक्ती स्वतः किंवा इतर व्यक्ती अथवा संस्थेशी संगनमत करून अमिष, फसवणूक किंवा बळजबरीने एखाद्याचे एका धर्मातून दुसऱ्या धर्मात धर्मांतर घडवून आणल्याचे सिद्ध झाल्यास सात वर्षांपर्यंत कारावास आणि एक लाख रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होणार आहे. महिला, अल्पबुद्धी किंवा मानसिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ती, अनुसूचित जाती-जमातीतील नागरिक तसेच सामूहिक धर्मांतराच्या प्रकरणांमध्ये दोषी आढळल्यास सात वर्षांपर्यंत कारावास आणि पाच लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

▸ पान २ वर

भूमी अभिलेख विभागाचा मोठा निर्णय!

# जमीन मोजणीच्या नोटिसा आता स्पीड पोस्टने थेट दारात



**■ पुणे (अकिल शेख) :** जमीन मोजणीची प्रक्रिया अधिक जलद, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्यासाठी राज्याच्या भूमी अभिलेख विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत ई-पोस्ट प्रणाली सुरू केली आहे. या नव्या व्यवस्थेनुसार, 'ई-काउंट २' या ऑनलाइन प्रणालीतून तयार होणाऱ्या मोजणीच्या नोटिसा थेट टपाल विभागाकडे ऑनलाइन पाठविल्या जाणार असून त्या स्पीड पोस्टद्वारे संबंधित पक्षकारांपर्यंत पोहोचवल्या जातील. जमीन मोजणीच्या प्रक्रियेत संबंधित सर्व पक्षकारांना नोटीस देणे कायद्याने बंधनकारक आहे. यामध्ये सर्व्हे क्रमांकधारक, मोजणीसाठी अर्ज करणारा, सहधारक, शेजारील जमीनधारक तसेच सातबाऱ्यावर नमूद असलेल्या इतर संबंधित व्यक्तींचा समावेश होतो. यापूर्वी या नोटिसा भूमी अभिलेख कार्यालयात छापून त्या प्रत्यक्ष टपाल कार्यालयात जमा कराव्या लागत होत्या. या प्रक्रियेमुळे वेळ, कागदपत्रे आणि मनुष्यबळाचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याने मोजणीच्या कामात विलंब होत असे. नवीन ई-पोस्ट प्रणालीमुळे ही प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल झाली असून, 'ई-काउंट २' प्रणालीत तयार झालेली नोटीस थेट टपाल विभागाकडे पाठविली जाणार आहे. त्यानंतर टपाल विभाग स्पीड पोस्टद्वारे संबंधित लाभार्थ्यांना नोटिसा वितरित करणार असल्याने नोटिसा अधिक वेगाने आणि वेळेत पोहोचण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पासाठी राज्य शासनाने २.८० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून राज्यभरातील भूमी अभिलेख विभागाच्या सर्व मोजणी प्रकरणांमध्ये ही सुविधा टप्प्याटप्प्याने लागू करण्यात येत आहे.

▸ पान २ वर

## संक्षिप्त

### विलंबित आयटीआरची संधी ३१ डिसेंबरपर्यंत!

**■ नवी दिल्ली :** आयकर रिटर्न (आयटीआर) भरण्याची नियमित अंतिम मुदत ३१ जुलै रोजी संपली असली, तरी वेळेत रिटर्न दाखल न करू शकलेल्या करदात्यांना अजूनही दिलासा आहे. आयकर कायद्याच्या कलम १३९(४) अंतर्गत मूल्यांकन वर्ष २०२६-२७ साठी विलंबित आयटीआर (Belated ITR) ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत दाखल करता येणार आहे. मात्र, संबंधित करदात्याचे मूल्यांकन (Assessment) त्यापूर्वी पूर्ण झाल्यास त्यानंतर विलंबित आयटीआर दाखल करता येणार नाही. विलंबित आयटीआर दाखल करण्यापूर्वी फॉर्म-१६, फॉर्म-२६एएस, वार्षिक माहिती विवरण (AIS), करदाते माहिती सारांश (TIS), बँक व्याजाची माहिती आणि इतर आर्थिक तपशीलांची पडताळणी करणे आवश्यक आहे. कराची थकबाकी असल्यास ती आधी भरून त्यानंतर आयटीआर दाखल करावा आणि ई-व्हेरिफिकेशनची प्रक्रिया पूर्ण करावी. विलंबित आयटीआर दाखल करणाऱ्यांना आयकर कायद्याच्या कलम २३४एफ अंतर्गत विलंब शुल्क भरावे लागते. वार्षिक उत्पन्न ५ लाख रुपयांपेक्षा जास्त असल्यास ५,००० रुपयांपर्यंत, तर ५ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असल्यास १,००० रुपयांपर्यंत शुल्क लागू शकते. तसेच कराची थकबाकी असल्यास कलम २३४ए, २३४बी आणि २३४सी अंतर्गत व्याजही भरावे लागते. त्यामुळे अतिरिक्त आर्थिक भार टाळण्यासाठी आणि भविष्यात कर्ज, व्हिसा व इतर आर्थिक व्यवहारांमध्ये अडचणी येऊ नयेत यासाठी उपलब्ध मुदतीत विलंबित आयटीआर दाखल करण्याचे आवाहन कर तज्ज्ञांनी केले आहे.

### १ सप्टेंबरपासून ॲपआधारित कॅब चालकांना ॲग्रीगेटर लायसन्स बंधनकारक!

**■ मुंबई :** राज्यातील ॲपआधारित कॅब सेवा अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. येत्या १ सप्टेंबरपासून ॲग्रीगेटर लायसन्स नसलेल्या कोणत्याही ॲपआधारित कॅब सेवा कंपनीला राज्यात प्रवासी वाहतूक करता येणार नाही. त्यामुळे ओला, उबेरसह सर्व ॲग्रीगेटर कंपन्यांनी त्या आधी परिवहन विभागाकडे अधिकृत लायसन्ससाठी नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी नियमांचे पालन न करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे. प्रवाशांकडून अवाजवी भाडे आकारणे, सुरक्षेतील त्रुटी आणि नियमांचे उल्लंघन यांसारख्या वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. नव्या नियमांनुसार कॅब सेवांचे भाडे राज्य सरकारच्या नियमनाखाली राहणार असून, मनमानी दर आकारण्यावर नियंत्रण ठेवले जाईल.

# न्यायालयांमध्ये डिजिटल बँक नोंदी ठरणार भक्कम पुरावा!

## १२५ वर्षे जुना ब्रिटिशकालीन कायदा इतिहासजमा होणार



**■ नवी दिल्ली (प्रगती शर्मा) :** न्यायालयांमध्ये बँकांच्या नोंदी पुरावा म्हणून सादर करण्यासंबंधीचा १८९१ मधील ब्रिटिशकालीन 'बँकर्स बुक्स एव्हिडन्स ॲक्ट' आता इतिहासजमा होण्याच्या मार्गावर असून, त्याऐवजी केंद्र सरकार 'बँकर्स बुक्स एव्हिडन्स विधेयक, २०२६' संसदेत सादर करणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज हे विधेयक संसदेत मांडणार असून, डिजिटल बँकिंग, ऑनलाइन व्यवहार आणि सायबर आर्थिक गुन्ह्यांच्या वाढत्या पार्श्वभूमीवर कायदेशीर चौकट आधुनिक करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. गेल्या काही वर्षांत डिजिटल बँकिंग आणि ऑनलाइन आर्थिक व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. त्याचबरोबर ऑनलाइन फसवणूक, डिजिटल अरेस्ट, सायबर आर्थिक गुन्हे आणि इलेक्ट्रॉनिक व्यवहारांशी संबंधित वादांमध्येही वाढ झाली आहे. या बदलत्या परिस्थितीचा विचार करून इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील बँक नोंदी आणि आधुनिक बँकिंग प्रणालीला अनुरूप असा नवा कायदा आणण्याची गरज निर्माण झाली होती. नवीन विधेयकामुळे न्यायालयात डिजिटल स्वरूपातील बँक नोंदींचा वापर अधिक स्पष्ट, सुलभ आणि कायदेशीरदृष्ट्या सक्षम होणार आहे. विधेयकातील सर्वात महत्त्वाची तरतूद म्हणजे 'विशेष कारण' (Special Cause) ही नवी संकल्पना. एखादी बँक न्यायालयीन प्रकरणात थेट पक्षकार नसल्यास, न्यायालयाला लेखी आदेश आणि ठोस कारण नोंदवल्याशिवाय संबंधित बँक अधिकाऱ्याला न्यायालयात हजर राहण्यास किंवा बँकेची कागदपत्रे सादर करण्यास भाग पाडता येणार नाही. त्यामुळे केवळ ग्राहकांच्या नोंदी बँकेत आहेत म्हणून बँक अधिकाऱ्यांना विनाकारण वारंवार न्यायालयात उपस्थित राहावे लागणार नाही. न्यायालय पुढील विशिष्ट परिस्थितींमध्येच 'विशेष कारण' नोंदवू शकणार आहे. त्यामध्ये बँकेतील नोंदींच्या अचूकतेवर किंवा विश्वासार्हतेवर संशय निर्माण झाल्यास, नियमित नोंद ठेवण्याच्या प्रक्रियेत त्रुटी असल्याचा संशय असल्यास किंवा न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यात बँकेने अपयश आल्यास अशा प्रकरणांचा समावेश आहे.

▸ पान २ वर

# नंबर प्लेट बदला, नाहीतर दंड!




**■ मुंबई (सम्यक कासारे) :** राज्यातील वाहनांचा वापर करून होणाऱ्या गुन्हेगारी घटनांवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी परिवहन विभागाने हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) अनिवार्य करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यातील प्रत्येक वाहनावर एचएसआरपी नंबर प्लेट असणे आता बंधनकारक करण्यात आले असून, या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम सुरू केली आहे. पोलिसांच्या तपासात अनेक गुन्ह्यांमध्ये साध्या नंबर प्लेट असलेल्या वाहनांचा गैरवापर झाल्याचे समोर आल्याने सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. एचएसआरपी नंबर प्लेटमध्ये विशेष सुरक्षा वैशिष्ट्ये असल्यामुळे वाहनांची ओळख पटवणे अधिक सोपे होते आणि बनावट नंबर प्लेट तयार करण्याची शक्यता कमी होते. त्यामुळे सर्व जुन्या वाहनांवरही ही विशेष नंबर प्लेट बसवणे अनिवार्य करण्यात आले आहे.

▸ पान २ वर

### HSRP साठी ३१ डिसेंबरची मुदत, व्हीआयपींनाही सूट नाही

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सर्व वाहनधारकांना ३१ डिसेंबरपूर्वी एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घेण्याचे आवाहन केले आहे. नवीन वाहनांना शोरूममधून बाहेर पडण्यापूर्वीच एचएसआरपी प्लेट बसवून दिल्या जात असल्याची माहिती त्यांनी दिली. राज्यातील सुमारे १ कोटी जुन्या वाहनांवर आतापर्यंत एचएसआरपी प्लेट बसवण्यात आल्या असून, हे प्रमाण एकूण जुन्या वाहनांपैकी सुमारे ५५ ते ५६ टक्के आहे. मात्र, अद्याप ४४ ते ४५ टक्के जुन्या वाहनांवर या प्लेट बसवलेल्या नसल्याने संबंधित वाहनधारकांनी अंतिम मुदतीपूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पुणेकरांनो, अजून किती वाट पाहणार?


## भूसंपादनात अडकले PMRDA चे ३,९०६ कोटींचे प्रकल्प!



**■ पुणे (अभिजीत येरल्लू) :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) अंतर्गत सुमारे ३ हजार ९०६ कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या सहा महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची कामे अद्याप कागदावरच असल्याचे चित्र समोर आले आहे. वर्षभरापूर्वी या प्रकल्पांवर प्रत्यक्ष कार्यवाही अपेक्षित असतानाही भूसंपादन, निविदा प्रक्रिया, विस्तृत प्रकल्प अहवाल आणि प्रशासकीय प्रक्रियांतील विलंबामुळे एकाही प्रकल्पाला अपेक्षित गती मिळालेली नाही. त्यामुळे वाहतूक कोंडीसह विविध नागरी समस्यांचे आव्हान प्रशासनासमोर कायम आहे. जिल्ह्यातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा अंतर्गत (इनर) रिंगरोड प्रकल्प अद्याप रखडलेलाच आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील सोळू ते वडगाव शिंदे या ४.७० किलोमीटर मार्गाच्या कामात जमिनीचे अधिग्रहण आणि वन विभागाच्या जमिनीशी संबंधित प्रस्ताव प्रलंबित असल्याने अडथळे निर्माण झाले आहेत. याशिवाय, तालुक्यातील १७ महत्त्वाच्या चौकांमध्ये (जंक्शन) सुधारणा करण्याचा प्रस्ताव असूनही त्यासाठी आवश्यक असलेला सविस्तर प्रकल्प अहवाल अद्याप पूर्ण झालेला नाही. त्यामुळे या कामालाही सुरुवात होऊ शकलेली नाही. इंद्रायणी, पवना, मुळा आणि मुठा नद्यांचे प्रदूषण कमी करण्याबरोबरच परिसराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी नदी सुधार प्रकल्प राबविण्याचे नियोजन करण्यात आले होते. या संदर्भात अनेक बैठका आणि चर्चा झाल्या; मात्र निविदा प्रक्रिया पूर्ण होण्यास झालेल्या विलंबामुळे हा प्रकल्पही प्रलंबित राहिला आहे.

▸ पान २ वर

# स्वातंत्र्यदिनापासून राज्यात क्यूआर कोडयुक्त 'स्मार्ट' शिधापत्रिका; २ कोटी कुटुंबांना लाभ



**■ मुंबई (गणेश बागडे) :** राज्यातील नागरिकांना अधिक सुरक्षित, सुलभ आणि आधुनिक स्वरूपातील शिधापत्रिका उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका वितरणाचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. या मोहिमेची सुरुवात १५ ऑगस्टपासून होणार असून, राज्यातील सुमारे १ कोटी ८६ लाख कुटुंबांना टप्प्याटप्प्याने स्मार्ट शिधापत्रिका वितरित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात केवळ पिवळ्या आणि केसरी शिधापत्रिकाधारकांना या स्मार्ट शिधापत्रिका दिल्या जाणार असून, या योजनेचा शुभारंभ गडचिरोली आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतून केला जाणार आहे. राज्याच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत हा प्रकल्प राबविण्यात येणार असून, सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर या दोन जिल्ह्यांमध्ये अंमलबजावणी केली जाईल. प्रायोगिक टप्प्यातील अनुभवाच्या आधारे आवश्यक सुधारणा करून पुढील टप्प्यांमध्ये संपूर्ण राज्यात ही योजना विस्तारली जाणार आहे. अनेक वर्षांपासून वापरात असलेल्या कागदी शिधापत्रिका फाटणे, खराब होणे किंवा हरविणे यांसारख्या समस्यांमुळे लाभार्थ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर क्यूआर कोडयुक्त स्मार्ट शिधापत्रिकांमुळे लाभार्थ्यांची माहिती अधिक सुरक्षित, अद्ययावत आणि सहज उपलब्ध राहणार आहे. यामुळे सार्वजनिक वितरण प्रणालीतील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि सेवा वितरणाची गुणवत्ता वाढण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना तसेच एपीएल शेतकरी योजनेतील पात्र शिधापत्रिकाधारकांना स्मार्ट शिधापत्रिका पूर्णपणे निःशुल्क उपलब्ध करून दिली जाणार आहे. राज्यातील सुमारे सात कोटी शिधापत्रिकाधारकांपैकी मोठा लाभार्थी वर्ग या उपक्रमाचा लाभ घेणार असून, त्यामध्ये एक कोटी ८६ लाख पिवळ्या आणि केसरी शिधापत्रिकाधारकांचा समावेश आहे.

▸ पान २ वर

संपादकीय

संपादक : राकेश शंकर गोरे

# पर्यावरणाचा न्याय की मंजुरीचा नवा मार्ग?

पर्यावरण संरक्षण हा केवळ कायदेशीर विषय नाही; तो भविष्यातील पिढ्यांच्या अस्तित्वाशी संबंधित प्रश्न आहे. म्हणूनच कोणताही मोठा प्रकल्प सुरू करण्यापूर्वी त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम तपासणे, जनतेचे म्हणणे ऐकणे आणि त्यानंतरच मंजुरी देणे ही प्रक्रिया अत्यावश्यक मानली जाते. सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निर्णयात सरकारला कार्यालयीन आदेशाद्वारे सरसकट पूर्वलक्ष्यी पर्यावरण मंजुरी देण्याचा अधिकार नाकारला. पहिल्या दृष्टीक्षेपात हा निर्णय पर्यावरणाच्या बाजूने वाटतो; मात्र त्याचा सखोल अभ्यास केला असता वेगळे चित्र समोर येते. २००६ मध्ये पर्यावरण परिणाम मूल्यांकन अधिसूचनेद्वारे २० हजार चौरस मीटरपेक्षा मोठ्या प्रकल्पांसाठी पूर्वपरवानगी बंधनकारक करण्यात आली. त्या काळात पर्यावरणीय शाश्वततेला महत्त्व देण्याचा प्रयत्न दिसत होता. परंतु २०१७ मध्ये केंद्र सरकारने अशी सुविधा दिली की, पूर्वपरवानगी न घेता सुरू केलेल्या प्रकल्पांनाही काही अटींवर मंजुरी मिळू शकते. यामुळे पर्यावरणीय कायद्याच्या मूळ तत्त्वालाच धक्का बसला. कारण कायद्याचा उद्देश नुकसान होण्यापूर्वी प्रतिबंध करणे हा आहे; नुकसान झाल्यानंतर त्याला वैधता देणे नव्हे. मद्रास उच्च न्यायालयात या निर्णयाला आव्हान दिल्यानंतर सरकारने ही एकदाच दिलेली सवलत असल्याचे सांगितले. तरीही त्याची मुदत वाढवण्यात आली. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने 'कॉमन कॉज' आणि 'अलेंबिक फार्मास्युटिकल्स' प्रकरणांत स्पष्ट शब्दांत सांगितले की, प्रकल्प सुरू झाल्यानंतर मंजुरी देणे हे पर्यावरण संरक्षणाच्या तत्त्वांशी विसंगत आहे. त्यामुळे अनेकांना वाटले की हा प्रश्न कायमचा निकाली निघाला. मात्र २०२१ मध्ये एका कार्यालयीन आदेशाद्वारे पुन्हा पूर्वमंजुरीशिवाय सुरू झालेल्या प्रकल्पांसाठी मार्ग खुला करण्यात आला. पर्यावरणवादी संस्थांनी त्याला आव्हान दिले आणि २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने तो आदेश रद्द केला. येथेपर्यंत चित्र स्पष्ट होते—पूर्वपरवानगी आवश्यक आहे. पण नंतरच्या फेरसुनावणीत तीन न्यायाधीशांच्या पीठाने वेगळा दृष्टिकोन स्वीकारला आणि अपवादात्मक परिस्थितीत सरकारला पर्यावरण संरक्षण कायद्याच्या कलम ३ अंतर्गत अशा मंजुरी देण्याचा मार्ग खुला ठेवला. याच ठिकाणी मुख्य प्रश्न निर्माण होतो. जर सरकार कार्यालयीन आदेशाने मंजुरी देऊ शकत नाही, पण कायद्यातील विशेष तरतुदींचा वापर करून तीच मंजुरी देऊ शकते, तर प्रत्यक्षात फरक किती? सामान्य नागरिकाला वाटू शकते की न्यायालयाने सरकारचे अधिकार कमी केले; परंतु तांत्रिकदृष्ट्या पाहिले तर सरकारकडे पर्याय अद्याप उपलब्ध आहे. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाच्या लढ्यातील अनिश्चितता कायम राहते. पर्यावरणशास्त्रातील एक मूलभूत तत्त्व म्हणजे "प्रतिबंध उपचारापेक्षा श्रेष्ठ". एखादा डोंगर कापून रस्ता तयार झाला, खारफुटी नष्ट झाली, नदीचे पात्र बदलले किंवा जंगलातील जैवविविधता उद्ध्वस्त झाली, तर नंतर केलेली भरपाई मूळ नुकसान भरून काढू शकत नाही. म्हणूनच पर्यावरणीय मंजुरी ही केवळ प्रशासकीय कागदपत्र नसून वैज्ञानिक, सामाजिक आणि नैतिक जबाबदारी आहे. आज देशभरात अनेक प्रकल्प "राष्ट्रीय हित", "विकास", "पायाभूत सुविधा" किंवा "अपवादात्मक परिस्थिती" या नावाखाली पुढे नेले जात आहेत. उत्तराखंडमधील डोंगरतोड, विदर्भातील खाण प्रकल्प, किनारपट्ट्यांवरील बांधकामे आणि शहरांमधील हरितपट्ट्यांचे रूपांतर ही काही उदाहरणे आहेत. या सर्व ठिकाणी प्रश्न एकच आहे—पर्यावरणीय परिणामांचा सखोल अभ्यास काम सुरू होण्यापूर्वी झाला का? हवामान बदलाचे परिणाम आता दूरचे राहिलेले नाहीत. अतिवृष्टी, उष्णतेच्या लाटा, पाणीटंचाई, पूर आणि भूस्खलन यांचा फटका सामान्य नागरिकांना बसत आहे. अशा वेळी पर्यावरणीय नियम शिथिल करण्याची कोणतीही शक्यता चिंतेची बाब ठरते. विकास आवश्यक आहे, परंतु विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष उभा करणे चुकीचे आहे. शाश्वत विकास म्हणजे आर्थिक प्रगती करताना नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे. सर्वोच्च न्यायालयाचा ताजा निर्णय पूर्णपणे पर्यावरणविरोधी आहे असे म्हणणे योग्य ठरणार नाही; परंतु तो पर्यावरण संरक्षणासाठी अंतिम विजयही नाही. न्यायालयाने एक मार्ग बंद केला असला तरी दुसरा मार्ग उघडा ठेवला आहे. त्यामुळे पुढील लढा न्यायालयातच नव्हे, तर धोरणनिर्मिती, वैज्ञानिक मूल्यांकन, स्थानिक समुदायांचा सहभाग आणि पारदर्शक प्रशासन या सर्व स्तरांवर लढावा लागणार आहे. पर्यावरणाचे रक्षण कागदोपत्री मंजुरींनी होत नाही; ते वेळेवर घेतलेल्या सावध निर्णयांनी होते. एखाद्या प्रकल्पाला नंतर वैधता देणे म्हणजे झालेल्या हानीवर शिक्कामोर्तब करण्यासारखे ठरू शकते. म्हणूनच खरा प्रश्न "मंजुरी कशी द्यायची?" हा नसून "हानी होण्यापूर्वी ती कशी टाळायची?" हा आहे. जर आपण हा मूलभूत प्रश्न विसरलो, तर कायदे बदलतील, अधिसूचना बदलतील, प्रक्रिया बदलतील; पण पर्यावरणीय संकटाचे वास्तव मात्र बदलणार नाही. विकासाच्या नावाखाली निसर्गाची किंमत सतत मोजावी लागणार असेल, तर भविष्यातील पिढ्या आपल्याला प्रगतीसाठी नव्हे, तर दूरदृष्टीच्या अभावासाठी आठवतील.

# शंभर वर्षांच्या वास्तूंचा धडा आणि २० वर्षांत मोडकळीस येणाऱ्या इमारतींचे वास्तव

मुंबई हे आज विरोधाभासांचे शहर बनले आहे. एका बाजूला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (१३९ वर्षे), मुंबई उच्च न्यायालय (१४८ वर्षे), राजाबाई टॉवर (१४८ वर्षे), मुंबई महापालिकेचे मुख्यालय (१३३ वर्षे), डेव्हिड ससून लायब्ररी (१५६ वर्षे), एल्फिन्स्टन कॉलेज (१३८ वर्षे) आणि छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय (१०४ वर्षे) यांसारख्या शतकाहून अधिक जुन्या वास्तू आजही दिमाखात उभ्या आहेत. तर दुसऱ्या बाजूला अवघ्या १५ ते २५ वर्षांपूर्वी बांधलेल्या अनेक इमारतींमध्ये गळती, भेगा, लोखंड गंजणे, स्लॅब कोसळणे आणि संरचनात्मक दोष दिसून येत आहेत. त्यामुळे प्रश्न इमारतींच्या वयाचा नसून बांधकामाच्या गुणवत्तेचा, देखभालीचा आणि जबाबदारीचा आहे. ब्रिटिशकालीन या वास्तूंनी दीडशे वर्षांहून अधिक काळ समुद्राच्या खाऱ्या वाऱ्याचा, मुसळधार पावसाचा, प्रदूषणाचा आणि लाखो नागरिकांच्या वर्दळीचा सामना केला आहे. तरीही त्या सुरक्षित आहेत. यामागे मजबूत पाया, दर्जेदार साहित्य, अभियांत्रिकीच्या निकषांचे काटेकोर पालन आणि नियमित देखभाल हीच प्रमुख कारणे आहेत. याउलट गेल्या दोन-तीन दशकांत पुनर्वसन, म्हाडा, एसआरए तसेच काही खासगी प्रकल्पांत उभारलेल्या अनेक इमारतींची अवस्था चिंताजनक झाली आहे. अनेक ठिकाणी नागरिक अक्षरशः जीव मुठीत धरून राहत आहेत. महापालिका इमारत अतिधोकादायक घोषित करूनही रहिवासी ती सोडण्यास तयार होत नाहीत. कारण घर सोडल्यानंतर पुन्हा कायमस्वरूपी निवारा मिळेल, याची हमी कोणतीही यंत्रणा देत नाही. अनेक कुटुंबांना ट्रांझिट कॅम्पमध्ये वर्षानुवर्षे, अगदी दोन पिढ्यांपर्यंत राहावे लागल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे इमारत कोसळेपर्यंत घर न सोडणे ही



त्यांची निवड नसून मजबुरी आहे. भिवंडीतील इमारत दुर्घटनेत दहा जणांचा मृत्यू झाला. मुंबई महानगर प्रदेशातील नऊ महापालिकांच्या हद्दीत तब्बल १,००४ अतिधोकादायक आणि सुमारे सहा हजार धोकादायक इमारती असल्याची वस्तुस्थिती अधिकच गंभीर आहे. काही प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत, तर काही ठिकाणी रहिवाशांना जबरदस्तीने बाहेर काढण्याची कारवाई सुरू आहे. मात्र, या इमारती इतक्या लवकर धोकादायक का बनल्या, याचा गांभीर्याने शोध घेण्याची तयारी फारशी दिसत नाही. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी संरचनात्मक तपासणी केली जाते आणि अनेक इमारती रिकाम्या करण्याचे आदेश दिले जातात. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, इमारतीचे आयुष्य तिच्या वयावर नव्हे, तर बांधकामाच्या दर्जावर आणि नियमित देखभालीवर अवलंबून असते. आजच्या बांधकाम व्यवस्थेतील अनेक त्रुटी या परिस्थितीस कारणीभूत ठरत आहेत. प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याची घाई, प्रत्येक टप्प्यावर होणारा भ्रष्टाचार, कंत्राटी व्यवस्थेतील त्रुटी, निकृष्ट दर्जाचे साहित्य, दर्जा नियंत्रणातील ढिलाई, ताब्यानंतरची अपुरी देखभाल आणि दोषींवर कारवाईचा अभाव यामुळे अनेक इमारतींचे आयुष्य अपेक्षेपेक्षा कमी होत आहे. पुनर्वसन प्रकल्पांतील वाढती लोकसंख्या, पार्किंग, पाणीपुरवठा आणि ड्रेनेज व्यवस्थेवरील अतिरिक्त ताण ही समस्या अधिक गंभीर बनवत आहे. ब्रिटिश काळात आधुनिक यंत्रसामग्री, संगणक किंवा अत्याधुनिक साहित्य नव्हते. मात्र, कामातील शिस्त, गुणवत्तेचा आग्रह आणि दीर्घकालीन नियोजन होते. आज तंत्रज्ञान प्रगत असूनही काही इमारतींचे आयुष्य दोन-तीन दशकांपुरतेच का मर्यादित राहते, हा प्रश्न सरकार, बांधकाम व्यावसायिक, अभियंते आणि नियामक यंत्रणांनी स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. मुंबईला केवळ पुनर्विकास नव्हे, तर टिकाऊ विकासाची गरज आहे. प्रत्येक नव्या इमारतीचे स्वतंत्र गुणवत्ता परीक्षण, नियमित स्ट्रक्चरल ऑडिट, दोषी कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई तसेच देखभालीची सक्ती ही काळाची गरज बनली आहे. घर खरेदी करण्यासाठी मध्यमवर्गीय नागरिक आयुष्यभराची कमाई खर्च करतात. मात्र, तेच घर पंधरा-वीस वर्षांत धोकादायक ठरल्यास त्यांचे संपूर्ण आयुष्य असुरक्षित बनते. इमारत कोसळल्यानंतर बिल्डरवर गुन्हा दाखल होतो, काही दिवस चर्चा रंगते आणि नंतर प्रकरण विस्मरणात जाते. दोषींना नेमकी कोणती शिक्षा झाली, याची माहिती जनतेपर्यंत क्वचितच पोहोचते. त्यामुळे अशा प्रकरणांत केवळ आर्थिक मदतीवर न थांबता दोषी अधिकारी आणि बिल्डरांवर सदोष मनुष्यवधासारखे गंभीर गुन्हे दाखल करण्याची वेळ आली आहे. महापालिका स्वायत्त असल्या तरी त्यांच्यावर राज्य सरकारचा प्रभावी अंकुश असणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक प्रकल्पासाठी रहिवाशांचा अपघात विमा आणि त्यासाठी बिल्डरांकडून स्वतंत्र निधी राखून ठेवण्याची सक्ती करण्याचाही विचार झाला पाहिजे. एकेकाळी ब्रिटनकडून भारतात शंभर वर्षांपूर्वी बांधलेल्या पुलांचे आयुष्य संपत आल्याची अधिकृत माहिती पाठवली जात होती. परंतु आज काही बिल्डर दोन वर्षांपूर्वी बांधलेल्या इमारतीचीही जबाबदारी स्वीकारण्यास तयार नसल्याचे चित्र दिसते. 'आमची इमारत पुढील शंभर वर्षे सुरक्षित राहील,' असा ठाम दावा एखाद्या बिल्डरच्या जाहिरातीत कधी दिसतो का, हा प्रश्नही तेवढाच महत्त्वाचा आहे. धोकादायक इमारतींच्या दुर्घटना टाळणे ही केवळ महापालिका किंवा सरकारचीच नव्हे, तर संपूर्ण बांधकाम व्यवस्थेची जबाबदारी आहे. अन्यथा शतकभर टिकणाऱ्या ऐतिहासिक वास्तू आपल्याला गुणवत्तेचा धडा देत राहतील आणि आधुनिक इमारती मात्र भ्रष्टाचार, निकृष्ट दर्जा आणि निष्काळजीपणाची साक्ष देत राहतील.

## पान १ वरून...

### स्वातंत्र्यदिनापासून राज्यात क्यूआर...

यापैकी सुमारे २५ लाख लाभार्थी अंत्योदय अन्न योजनेतील असून, एक कोटी ६१ लाख लाभार्थी प्राधान्य कुटुंब योजनेतील आहेत. मात्र, सफेद शिधापत्रिकाधारकांना सध्या स्मार्ट शिधापत्रिका दिल्या जाणार नसून, हा वर्ग प्रामुख्याने मध्यम व उच्च उत्पन्न गटातील आहे. स्मार्ट शिधापत्रिका तयार करताना लाभार्थ्यांचे आधार क्रमांकाशी संलग्नीकरण करण्यात येणार असून, चेहरा पडताळणी (फेस ऑथेंटिकेशन) प्रक्रियेद्वारे लाभार्थ्यांची अचूक ओळख निश्चित केली जाणार आहे. त्यामुळे अपात्र लाभार्थ्यांना आळा घालणे आणि पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा लाभ पारदर्शकपणे पोहोचविणे शक्य होणार आहे. या प्रकल्पाची संकल्पना स्वर्गीय अजितदादा पवार यांनी मांडली होती. गोरगरीब आणि सर्वसामान्य नागरिकांना जुन्या शिधापत्रिकांमुळे होणारा त्रास दूर करून त्यांना टिकाऊ, सुरक्षित आणि आधुनिक शिधापत्रिका उपलब्ध करून देण्याचा त्यांचा संकल्प आता प्रत्यक्षात साकार होत आहे. शासनाने १५ ऑगस्टपासून सुरू होणारी ही मोहीम २६ जानेवारीपर्यंत राज्यभर टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचे नियोजन केले असल्याची माहिती अन्न व नागरी पुरवठा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे.

### नंबर प्लेट बदला, नाहीतर दंड!

परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे की, ३१ डिसेंबरनंतर एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्या वाहनांविरोधात राज्यभर विशेष तपासणी मोहीम राबवण्यात येईल. परिवहन विभाग आणि पोलिस संयुक्तपणे कारवाई करत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करतील. या नियमांमधून कोणालाही सूट दिली जाणार नसल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले आहे. मंत्री, खासदार, आमदार किंवा इतर कोणतेही लोकप्रतिनिधी असले तरी त्यांनाही या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. ३१ डिसेंबरनंतर सर्वसामान्य नागरिकांप्रमाणेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या वाहनांवरही कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी ठामपणे सांगितले. प्रशासनाने वाहनधारकांना सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असलेली हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट तातडीने बसवून घेण्याचे आवाहन केले आहे. वाहनांची सुरक्षित ओळख, गुन्हेगारी घटनांवर नियंत्रण, बनावट नंबर प्लेटचा वापर रोखणे आणि कायद्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सर्व वाहनधारकांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता शक्य तितक्या लवकर एचएसआरपी नंबर प्लेट बसवून नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पुणेकरांनो, अजून किती वाट पाहणार?

दरम्यान, पीएमआरडीएअंतर्गत काही प्रकल्प वेळेत पूर्ण न झाल्याने ते गुंडाळण्याची वेळ आली आहे. त्यामध्ये 'मल्टी मॉडेल हब' हा प्रकल्प रद्द करण्यात आला आहे. तसेच, अंतर्गत रिंगरोडलगतच्या पाच गावांमध्ये सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभारण्यासाठी प्रस्तावित ३७० कोटी रुपयांचा प्रकल्प आणि १५ नगररचना योजना वेळेत पूर्ण न झाल्याने त्या रद्द करण्याची वेळ आली आहे. काही प्रकल्पांना नव्याने प्रशासकीय मान्यता घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी स्काय वॉकसंदर्भातील पायाभूत सुविधांची कामे लवकरच सुरू होणार असल्याचे सांगितले. तसेच नदी सुधार प्रकल्पांतर्गत कामांचे कार्यादेश सप्टेंबरअखेरपर्यंत जारी करण्यात येतील, अशी माहिती त्यांनी दिली. सर्व प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेण्यात आला असून, पुढील सहा महिन्यांत या सर्व प्रकल्पांना गती देऊन ते वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरू राहतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### न्यायालयांमध्ये डिजिटल बँक नोंदी...

अशा परिस्थितीतच न्यायालयाला संबंधित बँक नोंदी मागविण्याचा अधिकार राहणार आहे. नवीन विधेयकात 'बँकर्स बुक्स' या संज्ञेची व्याप्तीही मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आली आहे. यामध्ये पारंपरिक कागदी नोंदींसह इलेक्ट्रॉनिक नोंदी, डिजिटल रेकॉर्ड, व्हर्च्युअल डेटा, क्लाऊडवर संग्रहित माहिती तसेच भविष्यात विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानाधारित नोंदींचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे बदलत्या तंत्रज्ञानानुसार हा कायदा अधिक व्यापक स्वरूपात लागू राहणार आहे. विधेयकात इलेक्ट्रॉनिक पुराव्यांना कायदेशीर मान्यता देण्यासाठी प्रमाणित प्रमाणपत्र प्रणालीची तरतूद करण्यात आली आहे. हस्ताक्षर, डिजिटल स्वाक्षरी किंवा इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरीद्वारे अशा नोंदींचे प्रमाणीकरण करता येणार असून, हे पुरावे न्यायालयात कागदी किंवा इलेक्ट्रॉनिक अशा दोन्ही स्वरूपात सादर करता येतील. याशिवाय, या विधेयकाद्वारे केंद्र सरकारला आवश्यक अटी व शर्तींच्या अधीन राहून बँकांव्यतिरिक्त वित्तीय क्षेत्रातील इतर संस्थांनाही या कायद्याच्या कक्षेत आणण्याचा अधिकार देण्यात आला आहे. १८९१ मध्ये लागू झालेल्या 'बँकर्स बुक्स एव्हिडन्स ॲक्ट' अंतर्गत न्यायालयात मूळ लेजरऐवजी त्याच्या प्रमाणित प्रती पुरावा म्हणून ग्राह्य धरल्या जात होत्या. मात्र, त्या काळात डिजिटल व्यवहार किंवा इलेक्ट्रॉनिक नोंदी अस्तित्वात नसल्याने हा कायदा आजच्या तंत्रज्ञानाशी सुसंगत राहिलेला नव्हता. त्यामुळे आधुनिक बँकिंग व्यवस्थेच्या गरजा लक्षात घेऊन नवीन कायदा आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नवीन 'बँकर्स बुक्स एव्हिडन्स विधेयक, २०२६' लागू झाल्यानंतर डिजिटल बँकिंग व्यवहार, इलेक्ट्रॉनिक नोंदी आणि सायबर आर्थिक गुन्ह्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये पुरावे सादर करण्याची प्रक्रिया अधिक पारदर्शक, आधुनिक आणि सुलभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### जमीन मोजणीच्या नोटिसा आता स्पीड...

पुणे जिल्ह्यातही या प्रणालीची अंमलबजावणी सुरू झाली असून, २ ऑगस्ट २०२६ पासून 'ई-काउंट २' प्रणालीतून तयार होणाऱ्या मोजणी नोटिसा ई-पोस्टद्वारे पाठविण्याची प्रक्रिया प्रत्यक्षात सुरू झाली आहे. भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मते, या बदलामुळे नोटिसा वेळेत संबंधितांपर्यंत पोहोचतील, मोजणी प्रक्रियेत अधिक पारदर्शकता निर्माण होईल आणि प्रकरणांच्या निपटाऱ्याला गती मिळेल. तसेच कागदपत्रांची छपाई, प्रत्यक्ष टपाल कार्यालयात नेऊन जमा करण्याची गरज संपुष्टात येणार असल्याने विभागाचा वेळ आणि मनुष्यबळाचीही मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. स्पीड पोस्टद्वारे नोटिसांचे जलद वितरण, डिजिटल प्रक्रियेमुळे होणारी कार्यक्षमता आणि मोजणी प्रकरणांतील विलंब कमी होणे हे या नव्या प्रणालीचे प्रमुख फायदे मानले जात आहेत. या उपक्रमामुळे जमीन मोजणीसंबंधीची प्रशासकीय प्रक्रिया अधिक आधुनिक, सुलभ आणि नागरिकाभिमुख होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### बेकायदेशीर धर्मांतराला बसणार चाप

तसेच अशा प्रकारचा गुन्हा पुन्हा केल्यास दहा वर्षांपर्यंत कारावास आणि दहा लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. कायद्यानुसार धर्मांतरासंदर्भात गुन्हा दाखल झाल्यास आरोपीला आपण निर्दोष असल्याचे न्यायालयात सिद्ध करावे लागणार आहे. तसेच बेकायदेशीर धर्मांतराच्या उद्देशाने झालेला कोणताही विधिपूर्वक विवाह न्यायालयाकडून रद्द केला जाऊ शकतो. अशा विवाहातून जन्मलेल्या बालकाला आईचा धर्म लागू राहील, अशीही तरतूद करण्यात आली आहे. धर्मांतराची इच्छा असलेल्या व्यक्तीला दोन महिने आधी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागणार असून, त्याबाबत सार्वजनिक सूचना प्रसिद्ध केली जाईल. त्यावर आक्षेप आल्यास संबंधित व्यक्तीची पोलिसांमार्फत चौकशी करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. धर्मांतर झाल्यानंतर २१ दिवसांच्या आत त्याचा संपूर्ण तपशील जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक असेल. चुकीच्या पद्धतीने झालेले धर्मांतर रद्द करण्याचे अधिकारही जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. याशिवाय, धर्मांतराविरोधात नातेवाईकांनी तक्रार केल्यास ती नोंदवून तपास करणे पोलिसांसाठी बंधनकारक करण्यात आले असून, या कायद्याअंतर्गत नोंदविण्यात येणारे गुन्हे अजामीनपात्र असतील.

### राष्ट्रवादीच्या घटनेतील दुरुस्तीची...

पक्षाकडून याबाबत अधिकृत स्पष्टीकरण दिले जाणार का, याचीही उत्सुकता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर अजित पवार यांची राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. मात्र, २८ जानेवारी २०२६ रोजी मुंबईहून बारामतीकडे जात असताना त्यांचे विमान बारामती विमानतळाजवळ अपघातग्रस्त झाले आणि त्यात त्यांचे निधन झाले. त्यानंतर २६ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत सुनेत्रा पवार यांच्याकडे पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा सोपविण्यात आली. त्यानंतर पक्षाच्या संघटनात्मक रचनेत आणि घटनेत करण्यात आलेल्या बदलांबाबतच आता निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण आणि आवश्यक कागदपत्रांची मागणी केली आहे.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग, सा.बां.विभाग, वरळी, मुंबई
निविदा सुचना क्रमांक १७/२०२६-२७

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग, सा.बां.विभाग, वरळी, मुंबई (दूरध्वनी क्र. ०२२/४५६४६८८१) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे मागवित आहेत. सदरील निविदेमध्ये **०१ कामे** समाविष्ट असून या निविदेअंतर्गत संपुर्ण माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१ दहा लाखाच्या वरील **०१ कामे** आहेत (ई- निविदा)

या निविदेसंबंधी संपुर्ण माहिती खाली दिलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच यापुढील सर्व बदलांची माहिती याच संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

दहा लाखाच्या वरील (ई- निविदा) https://mahatenders.gov.in

जा.क्र.काअ/ममुंविवि/निविदा/ २८३१ /२०२६ दि. ३०.०७.२०२६

कार्यकारी अभियंता
मध्य मुंबई विद्युत विभाग,
सा.बां.विभाग, वरळी, मुंबई

आरओसी - 2026-27/क्र-5/C२०४९

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सूचनाक्र. ४३ सन २०२६-२७

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्र.०२२-२२०१६९७४/७६ हे खालील कामासाठी **अनुभवी कंत्राटदार / ठेकेदार** यांचेकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून **दि. ०३/०८/२०२६ ते दि. १०/०८/२०२६ दु.१५.०० पर्यंत देण्यात येईल.** भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा **दि. १३/०८/२०२६ त्या दिवशी दुपारी १५.०५ वाजेपर्यंत** स्विकारतील आणि शक्यता त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचेनाव | अंदाजित किंमत (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) | वर्ग | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | को-या निविदा नमुन्याची किंमत(रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Renovation of flooring and dado to passage near lift no. 8 lobby at ground floor & dado at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८४३५५०/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| २ | Renovation of Casualty passage lobby at Ground floor flooring & dado at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८४३५५०/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ३ | Renovation of passage near RMO office lobby at Ground floor flooring & dado at J. J. Group of Hospital, Mumbai | ८४३५५०/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ४ | Renovation of passage near ward no. 4 lobby at Ground floor flooring & dado at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८३५२७७/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ५ | Renovation of passage sonographic lobby at Ground floor flooring & dado at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८३७१८२/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ६ | Renovation of flooring & dado to passage near Medical store lobby at Ground floor flooring & dado at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८४३६९२/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ७ | Upgradation of flooring to passage lobby near lift number 9 at second floor at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८३२७६०/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ८ | Upgradation of passage near ward no. 11 2nd floor flooring and dado at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८३२७६०/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ९ | Upgradation of dado to passage near 9, 10, 11 Jobby dado at second floor at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८३२७६०/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

**जा.क्र.एघ(सा.बा)वि/निविदा/**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग,
बांधकाम भवन, २ रा मजला,
२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६
दिनांक :

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग,
फोर्ट, मुंबई.

आरओसी - 2026-27/क्र-5/C२०३३

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# 'ड्रग फ्री मुंबई'चा निर्धार; दोन हजार विद्यार्थ्यांसह मुख्यमंत्र्यांनी दिली व्यसनमुक्तीची शपथ

## शाळा-महाविद्यालय परिसरात ड्रग्स विक्रेत्यांवर कठोर कारवाई; 'ड्रग फ्री कॅम्पस' संकल्पना राज्यभर राबविणार

**मुंबई (राकेश गायकवाड) :** देशाच्या युवा शक्तीला अमली पदार्थांच्या विळख्यातून मुक्त ठेवण्यासाठी 'ड्रग फ्री मुंबई' ही लोकचळवळ बनविण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'नशामुक्त भारत' या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवण्यासाठी 'ड्रग फ्री मुंबई', 'ड्रग फ्री महाराष्ट्र' आणि 'ड्रग फ्री भारत' घडविण्याचा सामूहिक निर्धार आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वरळी येथील डोममध्ये आयोजित कार्यक्रमात 'ड्रग फ्री मुंबई' अभियानाचा शुभारंभ करताना त्यांनी उपस्थितांना अमली पदार्थमुक्त समाजाची शपथ दिली. या कार्यक्रमात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील दोन हजार विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून व्यसनमुक्तीची शपथ घेतली, तर ऑनलाइन माध्यमातून चार हजारांहून अधिक शाळा-महाविद्यालयांतील पाच लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी, पालक आणि नागरिक सहभागी झाले. कार्यक्रमाला मंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई महापालिका आयुक्त




अश्विनी भिडे, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, जिल्हाधिकारी, विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, समुपदेशक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, भारत विज्ञान, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि संरक्षण क्षेत्रात वेगाने प्रगती करत असताना देशातील तरुणांना अमली पदार्थांच्या जाळ्यात अडकविण्याचा कट रचला जात आहे. ड्रग्स हे या छुप्या युद्धातील सर्वात धोकादायक शस्त्र असून त्याविरोधातील लढा केवळ पोलीस किंवा शासनाचा नसून संपूर्ण समाजाचा आहे. प्रत्येक नागरिकाने या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. अमली पदार्थमुक्त समाजासाठी पोलीस, आरोग्य, सामाजिक न्याय, शिक्षण विभाग, पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. ड्रग्सची निर्मिती, तस्करी आणि विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल. विशेषतः शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या टोळ्यांचा संपूर्ण नायनाट करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक आणि महाविद्यालयांचे प्राचार्य यांना 'ड्रग फ्री कॅम्पस' आणि 'ड्रग फ्री स्कूल' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याबाबत सूचना देण्यात येणार आहेत. ड्रग्सविषयी माहिती देणाऱ्यांची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल आणि उपयुक्त माहिती पुरविणाऱ्यांना पुरस्कार देण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. व्यसनाधीन युवकांचे पुनर्वसन करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यावर शासनाचा भर राहणार असल्याचे सांगताना फडणवीस यांनी युवकांना कोणत्याही आमिषाला बळी न पडता व्यसनांना ठाम नकार देण्याचे आवाहन केले. स्वामी विवेकानंद, छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा उल्लेख करत त्यांनी राष्ट्रनिर्मितीसाठी सक्षम आणि व्यसनमुक्त युवा शक्ती उभी करण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी 'ड्रग फ्री मुंबई' हे केवळ सरकारी अभियान नसून जनसहभागातून उभी राहणारी व्यापक लोकचळवळ असल्याचे सांगितले. शाळा, महाविद्यालये आणि विविध शैक्षणिक संस्थांमध्ये जनजागृती, समुपदेशन आणि व्यसन प्रतिबंधक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या 'सीएम महाधन' कौशल्य विकास योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात एक लाख युवक-युवतींना प्रशिक्षण व स्वयंरोजगारासाठी मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. कार्यक्रमात 'ट्रेनिंग मॅन्युअल फॉर कौन्सेलर्स' या प्रशिक्षण पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले, तसेच विद्यार्थ्यांनी नृत्य आणि पथनाट्याद्वारे व्यसनमुक्तीचा प्रभावी संदेश दिला.

# मुंबई स्वच्छतेवर आयुक्तांचा फोकस; कचरा साचणाऱ्या ठिकाणांवर विशेष मोहीम

## अश्विनी भिडे यांचे अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश; झोपडपट्ट्यांतील कचरा संकलन, झाडलोट आणि पदपथ स्वच्छतेला प्राधान्य

**मुंबई (विशाल कारंडे) :** मुंबईत कचरा साचण्याची शक्यता असलेल्या संवेदनशील ठिकाणांची तातडीने ओळख करून तेथे प्रभावी स्वच्छता उपाययोजना राबवाव्यात, तसेच झोपडपट्टी व दाट लोकवस्तीच्या भागांतील कचरा संकलन व्यवस्था अधिक सक्षम आणि नियमित करावी, असे स्पष्ट निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. सार्वजनिक स्वच्छता व्यवस्थेचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी त्यांनी मानखुर्द, गोवंडी आणि परळ परिसराची सकाळी पाहणी करत स्वच्छता चौक्या, कचरा संकलन व्यवस्था आणि रस्त्यांची स्वच्छता तपासली. दौऱ्यादरम्यान आयुक्तांनी कचरा वाहतूक करणाऱ्या कॉम्पॅक्टर वाहनाची आकस्मिक पाहणी करून त्याच्या संपूर्ण कार्यपद्धतीची तपासणी केली. वाहन नियोजित मार्गावर वेळेत कार्यरत आहे का, कचरा उचलल्यानंतर निर्जंतुकीकरणाची फवारणी केली जाते का आणि संकलित कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावली जाते



का, याची त्यांनी प्रत्यक्ष खातरजमा केली. कचरा संकलनाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी वाहनांची संख्या आणि त्यांच्या फेऱ्यांमध्ये आवश्यक ती वाढ करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. अश्विनी भिडे म्हणाल्या की, प्रत्येक विभागाची लोकसंख्या, भौगोलिक रचना आणि कचरा निर्मितीचे प्रमाण वेगळे असल्याने परिसरनिहाय स्वच्छता आराखडा तयार करणे आवश्यक आहे. कचरा साचणाऱ्या संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांविरोधात कठोर दंडात्मक कारवाई करावी. आवश्यक असल्यास फौजदारी गुन्हे दाखल करण्याचीही तयारी ठेवावी. नागरिकांमध्ये जनजागृती वाढविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था आणि स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियानाच्या कर्मचाऱ्यांचा अधिक सहभाग सुनिश्चित करण्यावर त्यांनी भर दिला. मानखुर्द परिसरातील मोटर लोडर चौकीला भेट देताना त्यांनी घनकचरा व्यवस्थापनाची संपूर्ण माहिती घेतली. विशेषतः झोपडपट्टी भागांमध्ये दिवसातून किमान दोन वेळा कचरा संकलन करण्याची व्यवस्था करावी, तसेच कोणत्याही ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे तयार होणार नाहीत, यासाठी सातत्याने देखरेख ठेवावी, असे निर्देश त्यांनी दिले. गोवंडी येथील स्वच्छता चौकी आणि रस्ता दुरुस्ती चौकीची पाहणी करताना त्यांनी दैनंदिन झाडलोट कामाचा आढावा घेतला. शहरातील मुख्य रस्ते आणि वर्दळीचे मार्ग वाहतूक सुरू होण्यापूर्वीच स्वच्छ केले जावेत, जेणेकरून नागरिकांना स्वच्छ रस्त्यांचा अनुभव मिळेल आणि वाहतुकीत अडथळे निर्माण होणार नाहीत, असे त्यांनी सांगितले. आवश्यकतेनुसार अतिरिक्त मनुष्यबळ आणि यंत्रसामुग्रीचा वापर करून स्वच्छतेचा दर्जा उंचावण्याचे निर्देशही त्यांनी दिले. दौऱ्याच्या अखेरीस परळ परिसरातील पदपथांची पाहणी करताना आयुक्तांनी पदपथ कायमस्वरूपी स्वच्छ, चालण्यायोग्य आणि अतिक्रमणमुक्त ठेवण्यावर भर दिला. अनधिकृत वस्तू, बांधकाम साहित्य, फेरीवाल्यांमुळे होणारे अडथळे आणि कचऱ्याचे ढिगारे तातडीने हटवावेत तसेच त्यांची पुनरावृत्ती होणार नाही, यासाठी नियमित देखरेख ठेवावी, असे त्यांनी स्पष्ट केले. उप आयुक्त प्रशांत गायकवाड, उपायुक्त संध्या नांदेडकर, प्रशांत सपकाळे, सहाय्यक आयुक्त उज्ज्वल इंगोले यांच्यासह संबंधित अधिकारी या पाहणी दौऱ्यात सहभागी झाले होते. स्वच्छता व्यवस्थापनातील सुधारणा ही सातत्याने चालणारी प्रक्रिया असून प्रत्येक विभागाने स्थानिक गरजांनुसार नियोजन करून नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि कचरामुक्त मुंबई उपलब्ध करून देण्यासाठी अधिक प्रभावीपणे काम करावे, असे आवाहन आयुक्त अश्विनी भिडे यांनी केले.

# टीबीला घाबरू नका; वेळेवर उपचार घेतल्यास टीबी पूर्णपणे बरा होतो – राज्यपाल जिष्णू देव वर्मा

## 'टीबीमुक्त मुंबई' अभियानांतर्गत चेंबूर येथे जनजागृती फेरी

**मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आणि स्वप्नांची नगरी आहे. या स्वप्ननगरीला टीबीमुक्त करणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. समाजाने एकत्रितपणे प्रयत्न केल्यास टीबीमुक्त मुंबई आणि टीबीमुक्त भारताचे उद्दिष्ट निश्चितपणे साध्य होऊ शकते. टीबीविषयीचे गैरसमज दूर करून रुग्णांशी भेदभाव न करता त्यांना आधार देणे आवश्यक आहे. टीबीला घाबरण्याचे कोणतेही कारण नाही. वेळेत निदान होऊन योग्य उपचार घेतल्यास टीबी पूर्णपणे बरा होऊ शकतो," असे प्रतिपादन महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल श्री. जिष्णू देव वर्मा यांनी केले. महाराष्ट्र लोकभवन, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) कक्ष आणि श्री. नारायण गुरू कॉलेज ऑफ कॉमर्स, चेंबूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'टीबीमुक्त मुंबई' अभियानांतर्गत जनजागृती




फेरीचे आयोजन करण्यात आले. चेंबूर येथील श्री. नारायण गुरू कॉलेज ऑफ कॉमर्स येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सुप्रसिद्ध अभिनेते श्री. राकेश बेदी, अभिनेते श्री. शिव ठाकरे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, माननीय राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सहसचिव श्री. एस. राममूर्ती, महानगरपालिकेच्या एम पूर्व विभागाचे सहायक आयुक्त श्री. उज्ज्वल इंगोले तसेच राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. माननीय राज्यपाल श्री. जिष्णू देव वर्मा पुढे म्हणाले की, "टीबी हे केवळ वैद्यकीयच नव्हे, तर सामाजिक आणि आर्थिक आव्हानदेखील आहे. मात्र, या आजाराला घाबरण्याची आवश्यकता नाही. टीबीवर प्रभावी उपचार उपलब्ध असून रुग्णांनी वेळेवर तपासणी करून नियमित उपचार घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. केंद्र शासन, राज्य शासन तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमार्फत टीबी रुग्णांसाठी विविध उपचार सुविधा आणि योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. नागरिकांनी या सुविधांचा लाभ घेऊन उपचार पूर्ण करावेत." ते पुढे म्हणाले की, "एखाद्या व्यक्तीला टीबी झाला म्हणून त्याच्याशी भेदभाव करणे योग्य नाही. उलट अशा रुग्णांना मानसिक आधार आणि आवश्यक ती मदत करणे हीच खरी माणुसकी आहे." राज्यपालांनी दाट लोकवस्तीच्या भागांमध्ये टीबीविषयी व्यापक जनजागृती करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. "विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका तसेच विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून जनजागृती अधिक प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटकाने या अभियानात सक्रिय सहभाग घेतल्यास मुंबई लवकरच टीबीमुक्त होईल. आपल्या सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे टीबी रुग्णांसाठी आशेचा नवा किरण निर्माण होईल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी सुप्रसिद्ध अभिनेते श्री. राकेश बेदी म्हणाले की, "मुंबईकर कोणत्याही संकटाचा धैर्याने सामना करतात. प्रत्येक मुंबईकरामध्ये लढण्याची जिद्द आहे. ज्या पद्धतीने मुंबईकरांनी अनेक संकटांवर मात केली, त्याचप्रमाणे टीबीविरोधातील लढ्यातही त्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा. 'टीबीमुक्त मुंबई' हे केवळ एक अभियान न राहता लोकचळवळ बनणे आवश्यक आहे. जनसहभाग जितका वाढेल तितके या अभियानाचे सकारात्मक परिणाम अधिक वेगाने दिसून येतील."

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक(सा.बां.)विभाग, यांचे कार्यालय
Email : intergratedmumbai.ee@mahapwd.com
☎२२०१६९७४/७६
--

दरपत्रक सुचनापत्र क्रमांक १

कार्यकारी अभियंता एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, मुंबई यांचे कार्यालयाकरीता दैनंदिन वापराकरीता आवश्यक कार्यालयीन तसेच संगणकीय लेखनसामग्री खरेदी करण्याकरीता तसेच दिनांक ३१.०७.२०२६ ते ०७.०८.२०२६ रोजी पर्यंत ऑफलाईन पध्दतीने दर मागविण्यांत येत आहेत. प्राप्त दरपत्रके दिनांक १०.०८.२०२६ रोजी उघडण्यांत येतील. सदरील दर वस्तु व सेवा कर वगळून सादर करण्यांत यावे.

| अ.क्र. | मालाचे वर्णन | परिमाण | दरप्रती |
|---|---|---|---|
| 1. | Ammonia Roll (1.02 x10mtr size) | 1 No. | Roll |
| 2. | Box File full Rexzine heavy quality. (A/4 Size) | 1 No. | No. |
| 3. | Box File Plain (A4 Size) | 1 No. | No. |
| 4. | Box Ring File heavy (A4 Size) Small Thick | 1 No. | No. |
| 5. | Calculator Casio 12 Digit. | 1 No. | No. |
| 6. | Call Bell (Cell and Electric) | 1 No. | No. |
| 7. | Camel gum bottle 700 ml. | 1 No. | No. |
| 8. | Candle Box Medium size (8 Nos. each Box) | 1 Box. | Box |
| 9. | Carbon paper kores Sapphire (Blue) & Red. | 1 Box. | Box. |
| 10. | Cartridge 901 Black | 1 No. | No. |
| 11. | Cartridge 901 Colour | 1 No. | No. |
| 12. | Cartridge Black HP 2612A, HP388A, HP 7115A, Canon 303, 703, 925, 337. | 1 No. | No. |
| 13. | Cartridge Black HP 78 / HP 30A | 1 No. | No. |
| 14. | Cartridge Blade Change | 1 No. | No. |
| 15. | Cartridge Canon 725 Black | 1 No. | No. |
| 16. | Cartridge Canon 726 (Gray, Merzanda, Yellow, Cyan) | 1 No. | No. |
| 17. | Cartridge Canon 751 (Gray, Merzanda, Yellow, Cyan) | 1 No. | No. |
| 18. | Cartridge Canon 751 Black | 1 No. | No. |
| 19. | Cartridge Drum replacement Black Tonner | 1 No. | No. |
| 20. | Cartridge Drum Unit for Laser Printer Brother H-2255 DN | 1 No. | No. |
| 21. | Cartridge for Canon Laser Printer Canon 328 / 137A. | 1 No. | No. |
| 22. | Cartridge for Canon LBP 6230DN Toner No 326 Starter | 1 No. | No. |
| 23. | Cartridge for HP Laser Printer Toner No. Q5949A | 1 No. | No. |
| 24. | Cartridge for ink jet printer No. HP 78. | 1 No. | No. |
| 25. | Cartridge for ink jet Printer No. HP 88/ HP 818 | 1 No. | No. |
| 26. | Cartridge for ink jet printer No. HP818 Colour | 1 No. | No. |
| 27. | Cartridge for Laser Printer No. Brother H-2260 DN | 1 No. | No. |
| 28. | Cartridge for Plotter No. 72 Colour | 1 No. | No. |
| 29. | Cartridge for Plotter No. 72 Matt Black | 1 No. | No. |
| 30. | Cartridge for Samsung Laser Printer Toner No. ML 1053 | 1 No. | No. |
| 31. | Cartridge for Samsung Laser Printer Toner No. ML 2010 D3 | 1 No. | No. |
| 32. | Cartridge for Samsung Laser Printer Toner No. SCX-470 Toner No 103 | 1 No. | No. |
| 33. | Cartridge for Xerox Machine No. Canon IR-2525 | 1 No. | No. |
| 34. | Cartridge HP GT 51 Black | 1 No. | No. |
| 35. | Cartridge HP GT 51 Colour | 1 No. | No. |
| 36. | Cartridge Ink HP 853 /HP 818 /HP 680 Black | 1 No. | No. |
| 37. | Cartridge Ink HP 857 /HP 818 / HP 680 Colour. | 1 No. | No. |
| 38. | Cartridge Laser Jet Black HP 81A | 1 No. | No. |
| 39. | Cartridge Laser Jet Canon 418 Black, Yellow, Cyan & Merzanda | 1 No. | No. |
| 40. | Cartridge Laser Jet HP 305A Black, Yellow, Cyan & Merzanda | 1 No. | No. |
| 41. | Cartridge Laser Jet HP 312A Black, Yellow, Cyan & Merzanda | 1 No. | No. |
| 42. | Cartridge Refilling of all | 1 No. | No. |
| 43. | Cartridge Samsung Black 1043 & MLT D 101 S. | 1 No. | No. |
| 44. | Cello Brown Tape 1" x 65mtr | 1 No. | No. |
| 45. | Cello tape 2" thick (Transparent / Brown) | 1 No. | No. |
| 46. | Chair Cotton Cushion 16" x 16" x 4" Thick with cover | 1 No. | No. |
| 47. | Computer Keyboard Logitech USB | 1 No. | No. |
| 48. | Computer Keyboard Logitech Wireless | 1 No. | No. |
| 49. | Computer keyboard multimedia with USB cable | 1 No. | No. |
| 50. | Computer Keyboard TVS make Heavy quality | 1 No. | No. |
| 51. | Computer Mouse | 1 No. | No. |
| 52. | Computer Mouse Pad | 1 No. | No. |
| 53. | Computer Mouse Wireless | 1 No. | No. |
| 54. | Computer Optical mouse with USB cable | 1 No. | No. |
| 55. | Cup & Saucer set superior quality (6 Cup & 6 Saucer). | 1 Set. | Set. |
| 56. | Dungary cloth regular. | 1 No. | No. |
| 57. | Envelop Brown 80 G.S.M. size 10.0" x 12.0" | 1 No. | No. |
| 58. | Envelop Brown 80 G.S.M. size 11.0" x 5.0" | 1 No. | No. |
| 59. | Envelop Brown 80 G.S.M. size 16.0" x 12.0" | 1 No. | No. |
| 60. | Envelop Brown 80 G.S.M. size 6.5" x 4.0" | 1 No. | No. |
| 61. | Envelop Brown 80 G.S.M. size 9.5" x 4.5" | 1 No. | No. |
| 62. | Envelop Cloth Brown /White 80gsm size 10.0" x 12.0" | 1 No. | No. |
| 63. | Envelop Cloth Brown /White 80gsm size 5.0" x 4.0" | 1 No. | No. |
| 64. | Envelop Cloth Brown /White 80gsm size 9.5" x 4.5" | 1 No. | No. |
| 65. | Envelop Cloth Green colour heavy size 11.0" x 5.0" | 1 No. | No. |
| 66. | Envelop Cloth Green colour heavy size 12.0" x 10.0" | 1 No. | No. |
| 67. | Envelop Cloth Green colour heavy size 14.0" x 11.0" | 1 No. | No. |
| 68. | Envelop Cloth Green colour heavy size 16.0" x 12.0" | 1 No. | No. |
| 69. | Eraser Non dust (20 Nos. in each box) | 1 Box. | Box |
| 70. | Fevi stick Big size 15 gm. | 1 No. | No. |
| 71. | Files cover Thick in pair heavy along with four side corner with printing and lace. | 1 Pair. | Pair |
| 72. | Files cover Thin in pair heavy along with four side corner with printing and lace. | 1 Pair. | Pair |
| 73. | File covers Plastic heavy L shape A/4 size. | 1 No. | No. |
| 74. | File covers Plastic heavy L shape Full scape size. | 1 No. | No. |
| 75. | File covers Plastic heavy with side clip A/4 size. | 1 No. | No. |
| 76. | File covers Plastic heavy with side clip full scape size. | 1 No. | No. |
| 77. | File three lace heavy as per your sample ¼ size | 1 No. | No. |
| 78. | File Plastic folder A/4 size | 1 No. | No. |
| 79. | File Plastic folder F/C size | 1 No. | No. |
| 80. | File Spring full size | 1 No. | No. |
| 81. | File Velcro full Rexzine heavy as per sample. | 1 No. | No. |
| 82. | File white lace 36" long thick (144 nos. in bundle) | 1 No. | No. |
| 83. | Flap pad (Two Side) heavy 4" flap 4 side corner & full string. | 1 No. | No. |
| 84. | Glass coaster (6 Nos. each set) | 1 Set. | Set |
| 85. | Hand Wash (200 ml) | 1 Bottle. | Bottle |
| 86. | Hands wash (500 ml) | 1 Bottle. | Bottle |
| 87. | Hi – lighter set of 5 pens | 1 Set. | Set |
| 88. | Jotter Pen Refill | 1 No. | No. |
| 89. | Lock 5 Lever Godrej | 1 No. | No. |
| 90. | Lock 6 Lever Godrej | 1 No. | No. |
| 91. | Lock 7 Lever Godrej | 1 No. | No. |
| 92. | Magnetic Duster | 1 No. | No. |
| 93. | Marker for board | 1 No. | No. |
| 94. | Marker For Board Thick | 1 No. | No. |
| 95. | Matrix Spiral Pad | 1 No. | No. |
| 96. | Napkin 16" x 18" | 1 No. | No. |
| 97. | Napkin 22" x 24" best quality Bombay Dying. | 1 No. | No. |
| 98. | Note Book ( 200 Page) | 1 No. | No. |
| 99. | Note Book (Writing Pad) | 1 No. | No. |
| 100. | Note book Spiral deluxe No.5 | 1 No. | No. |
| 101. | Note book Spiral No.6 | 1 No. | No. |
| 102. | Note book Spiral No.8 | 1 No. | No. |
| 103. | Numbering Machine | 1 No. | No. |
| 104. | Paper A/3 size 75 G.S.M. | 1 Ream. | Ream |
| 105. | Paper A/4 size 75 G.S.M. | 1 Ream. | Ream |
| 106. | Paper cutter big | 1 No. | No. |
| 107. | Paper for Plotter (Plain Paper) roll size 36" x 50mtr | 1 Roll | Roll |
| 108. | Paper for Plotter (Plain Paper) roll size 42" x 50mtr | 1 Roll | Roll |
| 109. | Paper Full Scape size 75 G.S.M. | 1 Ream. | Ream |
| 110. | Paper Photo Glossy A/3 size | 1 Pkt | Pkt |
| 111. | Paper Photo Glossy A/4 size | 1 Pkt | Pkt |
| 112. | Paper Ruled full scape size heavy quality. | 1 Ream | Ream |
| 113. | Paper Weight Glass medium size | 1 No. | No. |
| 114. | Pen Add Gel Achiever | 1 No. | No. |
| 115. | Pen C.D. marker & white magnetic board (0.6 mm) | 1 No. | No. |
| 116. | Pen Cello Gripper / Reynolds Gel (5 Nos. in each) | 1 Pkt | Pkt |
| 117. | Pen Drive 64 GB | 1 No. | No. |
| 118. | Pen Drive 08 GB | 1 No. | No. |
| 119. | Pen Drive 16 GB | 1 No. | No. |
| 120. | Pen Drive 32 GB | 1 No. | No. |
| 121. | Pen Uniball Typing Eraser (white ink) make imported. | 1 No. | No. |
| 122. | Pencil Cell (8 Nos. in each Pkt.) | 1 No. | No. |
| 123. | Pencil Platinum HB (10 Nos. in each box) | 1 Box. | Box |
| 124. | Pin "T" head deluxe quality 400 gm. box | 1 Box | Box |
| 125. | Pin assorted Lion brand Deluxe 400 gm Box | 1 Box | Box |
| 126. | Pin cushion Magnetic | 1 No. | No. |
| 127. | Plastic Scale 1' deluxe. | 1 No. | No. |
| 128. | Poker Steel | 1 No. | No. |
| 129. | Poker Wooden Grip | 1 No. | No. |
| 130. | Post it pad multi colour size 3" x 1" | 1 Pkt | Pkt. |
| 131. | Post it pad yellow colour size 3" x 3" | 1 No. | No. |
| 132. | Punching Machine DP 480 Big | 1 No. | No. |
| 133. | Punching Machine Medium size 280 | 1 No. | No. |
| 134. | Register of Form No.70 Deposit as per sample & size (200 Pages) | 1 No. | No. |
| 135. | Register of hard cover binding Horizontal line Deluxe 1 Quire | 1 No. | No. |
| 136. | Register of hard cover binding Horizontal line Deluxe 2 Quire | 1 No. | No. |
| 137. | Register of hard cover binding Horizontal line Deluxe 3 Quire | 1 No. | No. |
| 138. | Register of hard cover binding Horizontal line Deluxe 4 Quire | 1 No. | No. |
| 139. | Register of hard cover binding Horizontal line Deluxe 5 Quire | 1 No. | No. |
| 140. | Register of hard cover binding Horizontal line laser paper Deluxe 6 Quire | 1 No. | No. |
| 141. | Register of hard cover binding Horizontal line Laser paper Deluxe 8 Quire | 1 No. | No. |
| 142. | Register of Inward 250 page each with both side printing in Marathi & heavy rexzine binding with corner, 90 GSM paper | 1 No. | No. |
| 143. | Register of Outward 250 pages each with both side printing in Marathi & heavy rexzine binding with corner, 90 GSM paper | 1 No. | No. |
| 144. | Room Freshener (250 ml) | 1 No. | No. |
| 145. | Rubber Stamp Dater Self Ink (Three Word In Per Line) | 1 Line | Line |
| 146. | Rubber Stamp Nylon 3 Line | 1 No. | No. |
| 147. | Rubber Stamp Nylon 4 Line | 1 No. | No. |
| 148. | Rubber Stamp Nylon 5 Line | 1 No. | No. |
| 149. | Rubber Stamp Nylon 6 Line | 1 No. | No. |
| 150. | Scissor Medium Size heavy. | 1 No. | No. |
| 151. | Sealing Wax Lion brand 8 Stick in box. | 1 Box | Box |
| 152. | Sketch Pen set Thick 12 colour | 1 Set | Set |
| 153. | Sketch Pen set Thin 12 colour | 1 Set | Set |
| 154. | Soap (3 Nos. in each box) | 1 Box | Box |
| 155. | Spike guard 4 pin | 1 No. | No. |
| 156. | Spike guard 5 pin | 1 No. | No. |
| 157. | Spike guard 6 pin | 1 No. | No. |
| 158. | Spiral Binding A/4 size above 100 pages | 1 No. | No. |
| 159. | Spiral Binding A/4 size up to 100 pages | 1 No. | No. |
| 160. | Stamp pad big size (Blue / Red) | 1 No. | No. |
| 161. | Stamp pad ink Violet colour 110 ml. | 1 No. | No. |
| 162. | Stamp pad medium size (Blue / Red) | 1 No. | No. |
| 163. | Stapler Big size HP-45. | 1 No. | No. |
| 164. | Stapler Machine Extra Large size heavy duty | 1 No. | No. |
| 165. | Stapler Medium size HD-10D | 1 No. | No. |
| 166. | Stapler pin 24/6 ( 20 pkts in box ) | 1 Pkt | Pkt. |
| 167. | Stapler pin 10 No. ( 20 pkts in box ) | 1 Pkt | Pkt. |
| 168. | Stapler Pins for Extra Large size stapler | 1 Pkt | Pkt. |
| 169. | Stapler Small size 10 No. | 1 No. | No. |
| 170. | Tag 8" Long Multi colour heavy. | 1 Bundle | Bundle |
| 171. | Tapal Pad Rexin (4 Flap) | 1 No. | No. |
| 172. | Tracing Paper 90 /95 gsm A/3 size | 1 Ream | Ream |
| 173. | Tracing Paper Roll for Plotter 36" | 1 Roll | Roll |
| 174. | Tracing Paper Roll for Plotter 42" | 1 Roll | Roll |
| 175. | Triangle Scale | 1 No. | No. |
| 176. | Trimax Gel Pen / Pental Gel Pen | 1 No. | No. |
| 177. | Trimex Ball pen | 1 No. | No. |
| 178. | Uniball Gel pen | 1 No. | No. |
| 179. | Utility HDP water proofing bag of size 16" x 16" x 13" including full size nylon protective belt and good quality chains etc. | 1 No. | No. |
| 180. | Water Colour (12 colour) | 1 Set | Set |
| 181. | Water Colour Faber Castle | 1 Set | Set |
| 182. | Water Glass heavy quality imported (200 ml) (6 Nos in Box) | 1 No. | No. |
| 183. | Water sponge | 1 No. | No. |
| 184. | White Chalk Box | 1 Box. | Box |
| 185. | Anti Virus Software with 1 year validity | 1 No. | No. |

अटी व शर्ती :-
१. दरपत्रके सिलबंद पाकिटात आणि कंपनीच्या नाममुद्रीत पत्रावर सादर करावीत.वर नमुद केलेल्या दिनांक आणि वेळेनंतर दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.
२. दरपत्रकातील दर वस्तु व सेवा कर वगळून सादर करावे तसेच नमुद केलेल्या ठिकाणापर्यंततच्या वाहतुकीच्या खर्चाचा अंतर्भाव केलेली असावीत.
३. कोणतेही कारण न देता दरपत्रक नामंजुर करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवलेला आहे.
४. दरपत्रकांसोबत वस्तु व सेवा कर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.
५. दुकाने व आस्थापणे प्रमाणपत्र (शॉप ॲक्ट) सोबत सादर करणे बंधनकारक आहे.

जा.क्र. काअ/एघवि/भांडार/ई-निविदा/ ४२५९
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.)विभाग, बांधकाम भवन, २ रा मजला, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६.
दिनांक :- २९|०७|२०२६.

(उदय डी.पालवे)
कार्यकारी अभियंता
एकात्मिकृत घटक(सा.बां.)विभाग,
मुंबई

आरओसी - 2026-27/क्र- 5/C२०१९

# कास्ट्राईब संघटनांच्या मागण्यांवर जिल्हा परिषद सकारात्मक; कर्मचारी प्रश्न सोडविण्यास प्रशासन कटिबद्ध

## सेवाविषयक प्रकरणे, डिजिटल सेवापुस्तके आणि शिक्षक भरतीसह विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा; त्रैमासिक बैठकीचीही मागणी

**ठाणे (तृप्ती गोरे) :** कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, कास्ट्राईब शिक्षक संघटना आणि महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ यांच्या विविध सेवाविषयक मागण्यांवर ठाणे जिल्हा परिषद प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली असून अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्याची ग्वाही मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी दिली. जिल्हा परिषद सभागृहात आयोजित बैठकीत कर्मचारी हिताच्या विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्ज्वला सपकाळे, शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी शोभा शेलार, जिल्हा




माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. स्वाती पाटील, कृषी विकास अधिकारी एम. एम. बाचोटीकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. कास्ट्राईब कर्मचारी व शिक्षक संघटनांचे पदाधिकारीही मोठ्या संख्येने सहभागी झाले. बैठकीत अधिकारी व कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके पूर्णपणे डिजिटल स्वरूपात अद्ययावत करण्यावर भर देण्यात आला. सेवापुस्तकांमध्ये सर्व आवश्यक नोंदी अचूकपणे समाविष्ट करून सेवा प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणण्याबाबत प्रशासन आणि संघटनांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. यामुळे भविष्यात सेवा विषयक प्रकरणे अधिक जलद आणि अचूक पद्धतीने निकाली काढण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना १०-२०-३० लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाने केलेल्या प्रयत्नांचे संघटनांच्या प्रतिनिधींनी विशेष कौतुक केले. कर्मचारी हिताच्या प्रश्नांवर सातत्याने संवाद सुरू राहावा यासाठी अशा बैठका दर तीन महिन्यांनी आयोजित करण्याची मागणीही संघटनांच्या वतीने करण्यात आली. बैठकीत प्राथमिक शिक्षकांच्या रिक्त पदांचाही मुद्दा उपस्थित झाला. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी रिक्त पदे तातडीने भरण्याची गरज व्यक्त करण्यात आली. तसेच गट विमा, भविष्य निर्वाह निधी, सेवा विषयक प्रकरणे आणि कर्मचारी कल्याणाशी संबंधित विविध प्रस्तावांवर प्रशासनाकडून होत असलेल्या कार्यवाहीबद्दल संघटनांनी समाधान व्यक्त केले. यावेळी रणजित यादव यांनी जिल्हा परिषद प्रशासन कर्मचारी हिताच्या प्रश्नांबाबत संवेदनशील असून सेवाविषयक प्रकरणे वेळेत निकाली काढण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले. विशेषतः सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतनासह इतर प्रलंबित प्रकरणे प्राधान्याने सोडविण्यावर भर दिला जाईल. अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या अडचणी संवाद आणि समन्वयातून सोडविणे हे प्रशासनाचे प्रमुख ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीस कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे कोकण विभागाध्यक्ष संतोष साबळे, केंद्रीय उपाध्यक्ष अनिल धांडे, सहसचिव जनार्धन राऊत, जिल्हाध्यक्ष दीपक साळवे, शिक्षक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष विजय जाधव, कोकण विभागाध्यक्ष संतोष गाढे, प्रदेश सचिव शिवाजी बिबराळे, कार्याध्यक्ष राहुल नगराळे, जिल्हाध्यक्ष किशोर भोईर यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत प्रशासन आणि कर्मचारी संघटनांमधील समन्वय अधिक मजबूत करण्याचा तसेच कर्मचारी हिताच्या प्रश्नांवर नियमित संवाद कायम ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# माळशेज घाट बंद; पर्यटन ठप्प, स्थानिक व्यावसायिकांवर आर्थिक संकट



**मुरबाड (विशाल कारंडे) :** मुसळधार पावसामुळे माळशेज घाटातील रस्ता खचल्याने घाटमार्ग वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. परिणामी पावसाळ्यात पर्यटकांनी गजबजून जाणारा संपूर्ण परिसर सध्या ओस पडला असून, पर्यटनावर अवलंबून असलेल्या स्थानिक व्यावसायिकांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. घाट कधी सुरू होणार, याकडे आता स्थानिक नागरिक आणि व्यवसायिकांचे लक्ष लागले आहे. पावसाळ्याच्या दिवसांत माळशेज घाट, नाणेघाट, कासाराचा नाळा, दुर्गांचा नाळा, थितबी, काळू धबधबा आणि परिसरातील अन्य नैसर्गिक पर्यटनस्थळांना हजारो पर्यटक भेट देतात. या पर्यटकांमुळे स्थानिक अर्थचक्राला मोठी चालना मिळते. मात्र, यंदा घाटातील रस्ता वाहून गेल्याने संपूर्ण मार्ग बंद करण्यात आल्यामुळे पर्यटकांची ये-जा थांबली आहे. घाटमार्ग बंद झाल्याचा सर्वाधिक फटका चहाच्या टपऱ्या, वडापाव व भजी विक्रेते, नाश्त्याची दुकाने तसेच छोट्या व्यावसायिकांना बसला आहे. पावसाळ्यातील दोन-तीन महिन्यांच्या व्यवसायावर अनेकांचे वर्षभराचे उत्पन्न अवलंबून असते. मात्र, पर्यटकच नसल्याने अनेक दुकाने दिवसभर ओस पडलेली असून काहींनी तात्पुरती दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सामाजिक कार्यकर्ते नथू पारधी यांनी सांगितले की, पर्यटकांच्या सुरक्षेसाठी घाट बंद ठेवण्याचा निर्णय योग्य असला तरी रस्त्याची तातडीने पाहणी करून दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर सुरू करणे आवश्यक आहे. घाट लवकर सुरू झाला तरच स्थानिक व्यवसाय पुन्हा रुळावर येऊ शकतील. स्थानिक नागरिक आणि व्यावसायिकांनी प्रशासनाकडे रस्त्याची दुरुस्ती तातडीने पूर्ण करून सुरक्षित वाहतूक सुरू करण्याची मागणी केली आहे. माळशेज घाट हा केवळ पर्यटनाचा नाही, तर अनेक कुटुंबांच्या उपजीविकेचा आधार असल्याने घाटमार्ग दीर्घकाळ बंद राहिल्यास स्थानिक अर्थव्यवस्थेवर त्याचे गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सध्या सर्वांचे लक्ष घाटमार्ग पूर्ववत सुरू होण्याकडे लागले आहे.

# काळा तलावातील अल्पवयीन मुलीच्या मृत्यूनंतर सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह



**कल्याण (गणेश बागडे) :** प्रतिनिधी कल्याण पश्चिम येथील काळा तलावात उडी मारून बुडून १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलीस सर्व बाजूंनी तपास करत आहेत. मात्र घटनेनंतर काळा तलाव परिसरातील सुरक्षाव्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. तलाव परिसराची सुरक्षा आणि देखरेख एका खासगी कंत्राटदाराकडे सोपविण्यात आली असतानाही, येथे वारंवार अशा घटना घडल्याने संबंधित कंपनी अनेक दिवसांपासून बंद असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, घटना घडली त्यावेळी सुरक्षा रक्षक नेमके कुठे होते, असा सवाल उपस्थित होत आहे. परिसरातील पथदिवेही अनेक दिवसांपासून बंद असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर मनसेचे नगरसेवक गणेश लाडा यांनी संबंधित अधिकाऱ्यांना धारेवर धरले. महापौर कार्यालयात महापौर हर्षाली चौधरी यांनी स्मार्ट सिटी आणि वीज विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांच्याकडून स्पष्टीकरण मागितले. कोट्यवधी रुपये खर्च करूनही नागरिक सुरक्षित नसतील, तर त्या खर्चाचा उपयोग काय? असा सवाल महापौर हर्षाली चौधरी आणि गणेश लाडा यांनी उपस्थित केला. यापूर्वी केडीएमसीच्या शास्त्रीनगर रुग्णालयात नगरसेवक रमेश म्हात्रे यांनी डॉक्टर आणि परिचारिकांना मारहाण केल्याची घटना घडली होती. त्यावेळी सुरक्षा रक्षक परिस्थिती नियंत्रणात आणण्यात अपयशी ठरल्याचा टीकाही झाली होती. तसेच, कल्याणच्या रुक्मिणीबाई रुग्णालयातही भटके कुत्रे मुक्तपणे फिरत असल्याने रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांच्या सुरक्षेचा प्रश्न वारंवार उपस्थित होत आहे. या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर केडीएमसीच्या विविध ठिकाणी नेमण्यात आलेले सुरक्षा रक्षक नेमके कोणती जबाबदारी पार पाडत आहेत, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. काळा तलावातील घटनेनंतर संबंधित यंत्रणांनी सुरक्षेतील त्रुटी तातडीने दूर करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिक करीत आहेत

# अभूतपूर्व अतिवृष्टीमुळे बंधाऱ्याचे आंशिक नुकसान; जलसंधारणाचा उद्देश मात्र यशस्वी

**पालघर (रघुनाथ कदम) :** पालघर तालुक्यात मागील पंधरा दिवसात झालेल्या अभूतपूर्व अतिवृष्टीमुळे डोंगराळ भागातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा वेगवान प्रवाह निर्माण झाला. या नैसर्गिक आपत्तीमुळे चहाडे घाटाच्या पायथ्याशी वन विभागामार्फत उभारण्यात आलेल्या सिमेंट बंधाऱ्याच्या डाव्या बाजूस मातीची धूप होऊन काही प्रमाणात नुकसान झाले. सदर ठिकाणी एक माणूस वाहून जाताना स्थानिक नागरिकांनी त्याला वाचवले. मोठ्या प्रमाणावर वृक्षाच्या गुंठ्यावरील माती वाहून दिल्याने मोठमोठी झाडे उन-मळून पडलेली असल्याने पाण्याच्या अक्षरशा लाटा त्या ठिकाणी पहावयास मिळाले असे स्थानिकांनी सांगितले वन विभागाच्या प्राथमिक पाहणीनुसार, अतिवृष्टीपूर्वी व त्यानंतरही सदर बंधाऱ्याने मोठ्या प्रमाणात पाणी अडविणे, गाळ व सुपीक माती वाहून जाण्यापासून रोखणे आणि भूजल पुनर्भरण करण्याचे कार्य प्रभावीपणे केले आहे. डोंगर उतारावरील मोठ्या प्रमाणातील गाळ आणि माती खालील शेतीमध्ये वाहून जाण्याऐवजी बंधाऱ्यामध्ये साचल्याने जमिनीची धूप कमी



झाली असून नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण झाले आहे.मात्र, या घटनेमुळे बंधाऱ्याचा मूलभूत उद्देश अपयशी ठरला, असे म्हणणे वस्तुस्थितीला धरून नसल्याचे वन विभागाने स्पष्ट केले आहे. बंधाऱ्यामुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी व बोअरवेलमधील पाण्याची पातळी वाढल्याचे स्थानिक स्तरावर निदर्शनास आले आहे. पावसाचे पाणी वेगाने वाहून न जाता जमिनीत मुरण्याचे प्रमाण वाढल्याने भूजल पुनर्भरणास चालना मिळाली असून त्याचा थेट लाभ शेती, फळबागा व पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेस झाला आहे. तसेच बंधाऱ्यात निर्माण झालेला जलसाठा दीर्घकाळ टिकून राहत असल्याने उन्हाळ्यातही वन्य प्राणी, पक्षी व इतर जैवविविधतेसाठी पाण्याचा महत्त्वाचा स्रोत उपलब्ध झाला आहे. यामुळे वन्यजीवांच्या अधिवासाचे संवर्धन होण्यास मदत होत असून मानव–वन्यजीव संघर्ष कमी करण्यासही अप्रत्यक्ष सहाय्य मिळत आहे. वन विभागाच्या म्हणण्यानुसार, सदर बंधाऱ्याचे मुख्य उद्दिष्ट केवळ पाणी अडविणे नसून जलसंधारण, मृदसंधारण, भूजल पुनर्भरण, गाळ नियंत्रण, जैवविविधतेचे संवर्धन आणि स्थानिक जलस्रोत बळकट करणे हे आहे. या सर्व बाबींमध्ये सदर संरचनेमुळे परिसराला लक्षणीय लाभ झाला आहे. वन विभागाने स्पष्ट केले आहे की, सदर काम अद्याप पूर्णत्वास आलेले नसून त्यास अंतिम पूर्णत्वाचा दाखला देण्यात आलेला नाही तसेच अंतिम देयकही अदा करण्यात आलेले नाही. करारातील अटींनुसार संबंधित काम अद्याप दोषदायित्व कालावधी (Defect Liability Period) अंतर्गत असून, कामातील कोणतीही त्रुटी अथवा अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची दुरुस्ती करणे ही संबंधित कंत्राटदाराची करारनिहाय जबाबदारी आहे. याबाबत संबंधित कंत्राटदारास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून पाया, कॉंक्रीटची गुणवत्ता, संरक्षणात्मक उपाययोजना, गाईड वॉल, ॲप्रन, धूप प्रतिबंधक व्यवस्था तसेच मंजूर आराखड्यानुसार कामाची अंमलबजावणी झाली आहे की नाही, याबाबत सविस्तर स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे.

# ड्रग फ्री मुंबई जनजागृती अभियानांतर्गत टिटवाळा रेल्वे स्थानकात शपथ व जागृती रॅली

**टिटवाळा (आकाश कांबळे) :** ड्रग फ्री मुंबई जनजागृती अभियानांतर्गत गुरुवारी टिटवाळा रेल्वे स्थानक परिसरात अंमली पदार्थविरोधी जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात पोलीस अधिकारी, रेल्वे प्रवासी, प्रवासी संघटनांचे पदाधिकारी, पोलीस मित्र, रेल्वे सुरक्षा बलाचे अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात ‘ड्रग फ्री मुंबई’ची सामूहिक शपथ घेऊन करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांनी QR कोड स्कॅन करून ऑनलाइन शपथ नोंदवली. अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती व्हावी आणि समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचावा, या उद्देशाने टिटवाळा रेल्वे स्थानक परिसरात जनजागृती रॅली काढण्यात आली. या अभियानाला रेल्वे प्रवाशांनी उत्स्फूर्त प्रतिसाद




दिला. कार्यक्रमाचे वृत्तांकन व चित्रीकरण करण्यासाठी पत्रकारही उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन आसनगाव रेल्वे पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात आले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन लोंढे, पोलीस अधिकारी व कर्मचारी, रेल्वे सुरक्षा बलाचे अधिकारी, प्रवासी संघटनांचे पदाधिकारी, रेल्वे प्रशासनाचे कर्मचारी आणि पोलीस मित्र यांनी उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

# दहीहंडी उत्सवानिमित्त गोविंदांना महानगरपालिकेकडून १० लाखांचे विमा संरक्षण

**विरार (सुचिता देशमुख) :** यंदाचा दहीहंडी उत्सव सुरक्षित, शिस्तबद्ध आणि नियमानुसार पार पाडण्यासाठी वसई-विरार शहर महानगरपालिकेने व्यापक तयारी सुरू केली आहे. गोविंदा पथकांना यंदाही महानगरपालिकेतर्फे १० लाख रुपयांपर्यंतचे मोफत विमा संरक्षण दिले जाणार असून, उत्सवासाठी आवश्यक सर्व शासकीय परवानग्या सुलभपणे मिळाव्यात यासाठी लवकरच ‘एक खिडकी योजना’ सुरू करण्यात येणार असल्याची माहिती महापौर अजीव पाटील यांनी दिली. दहीहंडी उत्सवाच्या नियोजनासंदर्भात महापौर अजीव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्यालयात संयुक्त बैठक झाली. बैठकीला गोविंदा पथके, दहीहंडी उत्सव आयोजक, पोलीस, वाहतूक, महावितरण, अग्निशमन, आरोग्य



विभाग तसेच महानगरपालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी उपआयुक्त अजित मुठे यांनी मागील वर्षीच्या विमा योजनेचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, गतवर्षी महानगरपालिकेकडे नोंदणीकृत ९९ गोविंदा पथकांतील ६,६५२ गोविंदांना १० लाख रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण देण्यात आले होते. यंदाही ही योजना सुरू राहणार असून गोविंदा पथकांनी विमा अर्ज अचूक भरून आवश्यक कागदपत्रांसह महानगरपालिकेकडे वेळेत सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले. महानगरपालिकेकडून विमा संरक्षण मिळत असले तरी आयोजकांनी उत्सवस्थळी सर्व सुरक्षा उपाययोजना काटेकोरपणे राबविणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. विशेषतः महिला गोविंदा पथकांसाठी शक्य तेथे मोबाईल शौचालयांची व्यवस्था करण्यात येणार आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त गीते यांनी आयोजकांना वाहतूक कोंडी टाळण्यासाठी योग्य नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. मंडप रस्त्यावर येणार नाहीत याची खबरदारी, स्वयंसेवकांची नियुक्ती, ओळखपत्रांचा वापर, वेळेचे पालन आणि ध्वनीप्रदूषण नियंत्रणाबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. डीजेवर अश्लील गाणी वाजवू नयेत तसेच बॅनर, फ्लेक्स आणि जाहिरातींसाठी आवश्यक परवानग्या घेण्याचेही त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र राज्य दहीहंडी असोसिएशनच्या सचिव गीता झगडे यांनी वसई-विरार महानगरपालिका ही गोविंदा पथकांना मोफत विमा संरक्षण देणारी महाराष्ट्रातील पहिली महानगरपालिका असल्याचे सांगत या उपक्रमाचे कौतुक केले. महावितरण विभागाने दहीहंडी विद्युत वाहिन्यांपासून सुरक्षित अंतरावर उभारण्याच्या तसेच अधिकृत वीजजोडणी घेण्याच्या सूचना दिल्या. अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांनी सांगितले की, सर्व आयोजकांनी शासन आणि न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. महानगरपालिकेचे वैद्यकीय, अग्निशमन आणि घनकचरा व्यवस्थापन विभाग उत्सव काळात सज्ज राहतील. महापौर अजीव पाटील यांनी १४ वर्षांखालील मुला-मुलींचा गोविंदा पथकात समावेश करू नये, मुख्य रस्त्यांवर उत्सव टाळावा, थर रचताना सुरक्षा साहित्याचा वापर करावा आणि वेळेचे बंधन पाळावे, असे आवाहन केले. उत्सवस्थळांजवळील खाजगी रुग्णालयांनाही आपत्कालीन सेवेसाठी सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. सर्वांच्या सहकार्याने दहीहंडी उत्सव उत्साहात आणि सुरक्षित वातावरणात साजरा करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक(सा.बां.)विभाग, यांचे कार्यालय
Email : intergratedmumbai.ee@mahapwd.com
☎२२०१६९७४/७६
--

**दरपत्रक सुचनापत्र क्रमांक २**

कार्यकारी अभियंता एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, मुंबई यांचे कार्यालयाकरीता झेरॉक्स (छायांकित प्रती) प्रिंटींग संच तयार करणे इ. दैनंदिन कामकाजाकरीता दिनांक ३१.०७.२०२६ ते ०७.०८.२०२६ रोजी पर्यंत ऑफलाईन पध्दतीने दर मागविण्यांत येत आहेत. प्राप्त दरपत्रके दिनांक १०.०८.२०२६ रोजी उघडण्यांत येतील. सदरील दर वस्तु व सेवा कर वगळून सादर करण्यांत यावे.

| अ.क्र. | मालाचे वर्णन | परिमाण | दरप्रती |
|---|---|---|---|
| 1. | Data Entry (D.T.P.) A/4 Size | 1/No. | /No. |
| 2. | Data Entry (D.T.P.) A/3 Size | 1/No. | /No. |
| 3. | Laser output A/4 Size | 1/No. | /No. |
| 4. | Laser output A/3 Size | 1/No. | /No. |
| 5. | Digital Print A/4 Size (Colour) | 1/No. | /No. |
| 6. | Digital Print A/3 Size (Colour) | 1/No. | /No. |
| 7. | Digital Print 12 x 18 Card Size (Colour) | 1/No. | /No. |
| 8. | Plotting Colour output A/4 Size | 1/No. | /No. |
| 9. | Plotting Colour output A/3 Size | 1/No. | /No. |
| 10. | Plotting Colour output A/2 Size | 1/No. | /No. |
| 11. | Plotting Colour output A/1 Size | 1/No. | /No. |
| 12. | Plotting Colour output A/0 Size | 1/No. | /No. |
| 13. | Plotting Black output A/4 Size | 1/No. | /No. |
| 14. | Plotting Black output A/3 Size | 1/No. | /No. |
| 15. | Plotting Black output A/2 Size | 1/No. | /No. |
| 16. | Plotting Black output A/1 Size | 1/No. | /No. |
| 17. | Plotting Black output A/0 Size | 1/No. | /No. |
| 18. | Scanning A/4 Size Drawings in High Resolution | 1/A/4 | /A/4 |
| 19. | Scanning A/3 Size Drawings in High Resolution | 1/A/3 | /A/3 |
| 20. | Scanning A/2 Size Drawings in High Resolution | 1/A/2 | /A/2 |
| 21. | Scanning A/1 Size Drawings in High Resolution | 1/A/1 | /A/1 |
| 22. | Scanning A/0 Size Drawings in High Resolution | 1/A/0 | /A/0 |
| 23. | Binding A/3 Size | 1/No. | /No. |
| 24. | Binding Ordinary | 1/No. | /No. |
| 25. | Binding Spiral A/4 Size | 1/No. | /No. |
| 26. | Binding Spiral A/3 Size | 1/No. | /No. |
| 27. | Binding Hardbound | 1/No. | /No. |
| 28. | Binding Rexin | 1/No. | /No. |
| 29. | Colour Xerox A/4 Size | 1/No. | /No. |
| 30. | Colour Xerox A/3 Size | 1/No. | /No. |
| 31. | Xerox in A/4 Size | 1/No. | /No. |
| 32. | Xerox in A/3 Size | 1/No. | /No. |
| 33. | Scanning A/4 Size Text Matter in 300 dpi resolution in PDF format | 1/No. | /No. |
| 34. | Scanning A/3 Size Text Matter in 300 dpi resolution in PDF format | 1/No. | /No. |

**अटी व शर्ती :-**

१. दरपत्रके सिलबंद पाकिटात आणि कंपनीच्या नाममुद्रीत पत्रावर सादर करावीत.वर नमुद केलेल्या दिनांक आणि वेळेनंतर दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.
२. दरपत्रकातील दर वस्तु व सेवा कर वगळून सादर करावे तसेच नमुद केलेल्या ठिकाणापर्यंततच्या वाहतुकीच्या खर्चाचा अंतर्भाव केलेली असावीत.
३. कोणतेही कारण न देता दरपत्रक नामंजुर करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवलेला आहे.
४. दरपत्रकांसोबत वस्तु व सेवा कर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.
५. दुकाने व आस्थापणे प्रमाणपत्र (शॉप ॲक्ट) सोबत सादर करणे बंधनकारक आहे.

जा.क्र. काअ/एघवि/भांडार/ई-निविदा/ ४२५८
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.)विभाग, बांधकाम भवन, २ रा मजला, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६.
दिनांक :- २९/०७/२०२६.

(उदय डी.पालवे)
कार्यकारी अभियंता
एकात्मिकृत घटक(सा.बां.)विभाग,
मुंबई

आरओसी - 2026-27/क्र- 5/C२०१८

# सातारा जिल्हा बँकेत महायुतीची वाटचाल एकला चलो रे दिशेने

**सातारा (महेश पानसरे) :** सध्या बहुचर्चित असलेल्या सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी अकरा तालुक्यातील सोसायटी मधील मतदार ठराव साम-दाम-दंड-भेद आणि छेद माध्यमातून घेतले जात आहे. या ठरावाची मुदत दिनांक ५ ऑगस्ट पर्यंत आहे. त्यामुळे आता सामाजिक व विकास कामांपेक्षा ठराव घेण्यामध्ये नेतेगण मंडळी स्वतःला धन्य मानत आहे. ठराव... ठराव किती ही केले तरी सातारा जिल्हा बँकेत महायुतीची वाटचाल एकला चलो रे च्या दिशेने सुरू झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. सातारा जिल्हा बँकेमध्ये सत्ताधारी महायुतीपेक्षा भारतीय जनता पक्षाला स्वबळावर सत्ता मिळवण्याचे स्वप्न पडू लागली आहे. परंतु,महायुती व भाजपमधीलच काही मंत्री व माजी मंत्री यांचे राजकीय वैर सहकार क्षेत्रातही घुमू लागले आहे. त्याचे पडसाद उमटले आहेत. कितीही वेळा सांगितले तरीही जिल्हा बँक ही कधीच राजकारण विरहित राहिलेली नाही. पण, यंदा अटीतटीची लढत होत असल्याने राजकारण विरहित पण गटबाजीचे राजकारण उघडपणाने सुरू झाले आहे. काँग्रेस व राष्ट्रवादीच्या अनुभवातून आता भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आमदार मनोज घोरपडे, आमदार महेश शिंदे, डॉक्टर अतुल भोसले, आमदार धैर्यशील कदम सत्ता मिळवण्यासाठी मोर्चा बांधणी करत आहेत. सहकार क्षेत्रातील नवीन नियमाप्रमाणे दहा वर्ष सलग संचालक असणाऱ्यांना मुदतवाढ देण्यासाठी याचिका दाखल केली होती परंतु मे २०२६ रोजी नवीन आदेश व उच्च न्यायालयाने नकार दिला आहे. त्यामुळे काही संचालकांना अडचण राहिल्यामुळे सातारा जिल्हा सहकारी बँकेत आता मी पुन्हा येणार नसलो तरी माझी नातेवाईक येणार आहेत. असा अंदाज वर्तवण्यासाठी काही बिदागी बहादूरांची फौज उभी केली आहे. आदरणीय व सहकार महर्षी साताराचे दोन्ही राजे, फलटणचे



राजे, महाबळेश्वरचे राजपुरे, वाईचे दोन बंधू आणि दोन महिला, अनुसूचित जाती, भटक्या विमुक्त जाती जमाती, मजूर सोसायटी, इतर मागासवर्गीय, पतसंस्था, खरेदी विक्री संघ, शेती फळे फुले प्रक्रिया, गृहनिर्माण आणि कर्मचारी व सहकार निबंध असे प्रत्येकी एक संचालक असे संख्याबळ ठरावांच्या आकडेवारीनुसार सध्या तरी आहे. त्यामुळे मातब्बर मंडळींच्याच नेतृत्वाखाली जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत यश मिळणार आहे. हे सांगण्यासाठी ज्योतिषाची गरज नाही. हात दाखवून अवलक्षण करण्याची गरज नाही. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील नेत्यांच्या आश्रयाखाली यापूर्वी संचालक झालेल्या अष्टप्रधान मंडळांना आता नारळ मिळणार आहे. त्यामुळे नवीन चेहरे कोण? याची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे. बातमी मागील बातमी याचा जर विचार केला तर सध्या तरी माजी मंत्री बाळासाहेब पाटील, राजेंद्र तांबे,महिला वर्गामध्ये शारदादेवी सूर्याजीराव कदम ,ऋतुजा राजेश पाटील, स्मितादेवी शंभूराज देसाई, जयश्री रविंद्र कदम, तेजस्विनी घोरपडे, पूजा घार्गे तर संचालकांमध्ये जयकुमार गोरे, संजीवराजे नाईक निंबाळकर, अनिरुद्ध गाढवे, शंभूराजे देसाई, डॉ. रामचंद्र वांगडे, ज्ञानेश्वर रांजणे, माजी आमदार दीपक चव्हाण, चंद्रकांत जाधव,अरुण पवार, अशोक जाधव यांच्या नावाची नेत्यांच्या आशीर्वादाने नावे पुढे येत आहेत. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विद्यमान संचालक मंडळातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची धोरणात्मक निर्णयांमध्ये जिल्ह्यातील अनेक दिग्गज राजकीय आणि सहकार क्षेत्रातील नेत्यांचा समावेश आहे. एकमेका सहाय्य करू... अवघे धरू सुपंथ.. याची अनेकदा प्रचिती आली आहे. हे नेत्यांसाठी योग्य आहे. पण, स्थानिक पातळीवर पक्षीय राजकारण करताना कार्यकर्त्यांना संघर्ष केल्याशिवाय हाती काही येत नाही. ही वस्तुस्थिती आहे. फक्त ठराव घेण्यासाठी लागणारी ताकद कार्यकर्त्यांनी स्वतः वापरायचे असते. त्यामध्ये स्वतः संचालक होण्याची अपेक्षा ठेवायची नसते. अन्यथा काहींचे ठेकेदारीतील आरक्षण काढून दुसऱ्याला दिले जाईल. याची त्यांना भीती वाटते. सध्या ठराव मुळे होणारे संघर्ष स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेब व स्वातंत्र्य सेनानी किसनवीर आभार यांच्या विचाराला उघडपणाने तिलांजली देणारे ठरलेले आहे. याबाबत कुणीही भाष्य करत नाही. कारण हे विचार आत्मसात जरी केले तरी त्याची अंमलबजावणी करणे फार कठीण आहे. हे नेत्यांना सुद्धा माहित आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण होऊ नये यासाठीच नेते जागृत असतात. हे जिल्हा बँकेत नक्कीच दिसून येणार आहे. सध्या तरी महायुतीमध्ये एकला चलो रे चा नारा देऊन पदरात काही पाडून घेण्याची वेळ आलेली आहे. एकदा का निवडणूक पार पडली की ज्या ठिकाणी बिनविरोध निवडून येथील ते निवांत राहतील तरी इतर सहकाऱ्यांना संचालक निवडणुकीत निवडून देण्यासाठी पुन्हा एकदा सहल ...पळवा पळवी... आरोप प्रत्यारोप होतच राहणार आहे. हे झाले नाही तर मग जिल्हा बँक कसली? असे प्रतिप्रश्न केला जात आहे.

# सिंहस्थ रस्त्यावरील डांबरीकरणाला तडे

**नाशिक (सचिन कदम) :** सिंहस्थ कुंभमेळा २०२७ अंतर्गत सुरू असलेल्या संगम पूल - मिर्ची हॉटेल चौक - अमृतधाम चौक गुंजाळबाबा चौक - तारवाला चौक- मार्केट सिग्नल ते मखमलाबाद रोड (घाटाकडे जाणारा रस्ता / साधुग्राम पोहोच मार्ग) या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामादरम्यान करण्यात आलेल्या डांबरीकरणाच्या ट्रायल पॅचमध्ये तडे गेल्याचे आढळले आहे. त्यामुळे संबंधित ट्रायल पॅच निकषांमध्ये अपयशी ठरला असून, पावसाळ्यानंतर तो काढून नव्याने डांबरीकरण करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. या कामांतर्गत दि. १३ जुलै २०२६ रोजी गुंजाळबाबानगर येथे डीबीएम या डांबरमिश्रित थराचा टेस्ट / ट्रायल पॅच करण्यात आला होता. या प्रक्रियेत हॉट मिक्स प्लांटमधून आणलेल्या डांबरमिश्रित साहित्याचे अंथरण करून रोलिंग पॅटर्नची निश्चिती केली जाते. ट्रायल पॅच सर्व तांत्रिक निकष पूर्ण केल्यानंतरच उर्वरित



कामाला परवानगी दिली जाते. मात्र, ट्रायल पॅचवर रोलिंग केल्यानंतर त्यामध्ये तडे गेल्याचे निदर्शनास आले. सविस्तर तपासणीत हा ट्रायल पॅच आवश्यक निकष पूर्ण करीत नसल्याचे स्पष्ट झाल्याने तो काढून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच जॉब मिक्समधील ॲग्रीगेटचे प्रमाण बदलून सुधारित डीबीएम साहित्य तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, याबाबत १४ जुलै रोजी आयआयटी मुंबईकडे तातडीने तांत्रिक मार्गदर्शन मागविण्यात आले आहे.

# रायगड पोलिसांचा अंमली पदार्थांच्या रॅकेटवर निर्णायक घाव!



**रायगड (सचिन कदम) :** रायगड जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या अवैध निर्मितीला आळा घालण्यासाठी रायगड जिल्हा पोलीस दलाने आता अधिक आक्रमक आणि प्रभावी मोहीम हाती घेतली असून,अंमली पदार्थांच्या उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या प्री कर्सर केमिकलच्या गैरवापरावर कठोर नियंत्रण आणण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.या पार्श्वभूमीवर सोमवार दि.२७ जुलै २०२६ रोजी रिलायन्स इंडस्ट्रीजच्या सभागृहात पोलीस अधीक्षक श्रीमती.आंचल दलाल (भा.पो.से.) यांच्या अध्यक्षतेखाली एनडीपीएस कायदा व कर्सर केमिकलच्या संदर्भात भव्य समन्वय व जनजागृती बैठकीचे आयोजन करण्यात आले. खालापूर तालुक्यातील तीन पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील सुमारे ३० औद्योगिक कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी व प्रतिनिधी या बैठकीस उपस्थित होते.अंमली पदार्थांच्या साखळीला सुरुवातीलाच खीळ घालण्यासाठी उद्योग आणि पोलीस प्रशासन यांच्यात अधिक मजबूत समन्वय निर्माण करण्यावर या बैठकीत विशेष भर देण्यात आला. बैठकीत एनडीपीएस कायद्याच्या विविध तरतुदी, प्री कर्सर केमिकलचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व वापर यासंबंधीचे नियम, तसेच रसायनांच्या खरेदी-विक्रीचे अभिलेख व कागदपत्रे अद्ययावत ठेवण्याबाबत उद्योगांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. रसायनांची बेकायदेशीर वळवणूक रोखण्यासाठी कारखान्यांमध्ये अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्था, साठ्यांवर काटेकोर नियंत्रण आणि संशयास्पद हालचालींवर सतत देखरेख ठेवण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या. कोणत्याही अनधिकृत व्यक्तीकडून रसायनांची मागणी, संशयास्पद व्यवहार अथवा गैरवापराची माहिती मिळाल्यास ती तात्काळ पोलीस प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना पोलीस अधीक्षक श्रीमती.आंचल दलाल म्हणाल्या, अंमली पदार्थांच्या निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्री कर्सर केमिकल वर प्रभावी नियंत्रण ठेवणे ही केवळ पोलीस प्रशासनाची नव्हे,तर उद्योग क्षेत्राचीही संयुक्त जबाबदारी आहे. संशयास्पद व्यवहार, अनधिकृत मागणी किंवा रसायनांचा गैरवापर आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्या. उद्योग आणि पोलीस यांच्यातील सशक्त समन्वयामुळे एनडीपीएस कायद्याची प्रभावी अंमलबजावणी शक्य होईल.या बैठकीस खालापूरचे उपविभागीय अधिकारी डॉ. विशाल नेहुल, रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळसंबंधित पोलीस अधिकारी तसेच विविध औद्योगिक कंपन्यांचे वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते. उद्योग प्रतिनिधींनी एनडीपी एस कायद्याचे काटेकोर पालन करण्या बरोबरच रसायनांचा गैरवापर आणि बेकायदेशीर वळवणूक रोखण्यासाठी रायगड पोलिसांनी पूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही दिली.रायगड जिल्हा पोलीस दलाने भविष्यातही उद्योग क्षेत्राशी सातत्याने समन्वय साधत अंमली पदार्थांविरोधातील प्रतिबंधात्मक उपाययोजना, जनजागृती अभियान आणि अशा समन्वय बैठका नियमितपणे आयोजित करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# बेणसे जिल्हा परिषद शाळेच्या समस्यांवर लोकप्रतिनिधी आक्रमक

- शिक्षक भरती, इमारत दुरुस्ती व गैरहजर शिक्षकांवर कारवाईची मागणी
- जि.प. सदस्या पल्लवीताई भोईर व पंचायत समिती सदस्य संजय भोईर यांनी अधिकाऱ्यांची घेतली बैठक; विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तातडीच्या उपाययोजनांची मागणी



**रायगड (भावना जैन) :** रायगडच्या पेण तालुक्यातील बेणसे-झोतीरपाडा हद्दीतील रायगड जिल्हा परिषद शाळा, बेणसे येथे निर्माण झालेल्या विविध गंभीर समस्यांबाबत जिल्हा परिषद सदस्या सौ. पल्लवीताई प्रसाद भोईर आणि पंचायत समिती सदस्य श्री. संजय भोईर यांनी प्रशासनाची भेट घेत शाळेच्या प्रश्नांबाबत तीव्र चिंता व्यक्त केली. यावेळी गट शिक्षण अधिकारी सौ. शर्मिला शेंडे, केंद्र अधिकारी श्री. सरगडे तसेच शाळेतील शिक्षिका यांच्यासोबत सविस्तर बैठक घेण्यात आली. बैठकीस बेणसे व झोतीरपाडा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. बेणसे ग्रामपंचायत ग्रामसेवक सचिन घरत यांचीही प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत शाळेतील शिक्षकांच्या अपुऱ्या संख्येमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. विद्यार्थ्यांचा नियमित अभ्यास विस्कळीत होत असून शैक्षणिक गुणवत्ता खालावत असल्याची खंत लोकप्रतिनिधींनी व्यक्त केली. तसेच शाळेची इमारत अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे इमारतीची तातडीने दुरुस्ती करून विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. शाळेत बदली होऊनही प्रत्यक्ष कामावर हजर न झालेल्या शिक्षकांवर तात्काळ प्रशासकीय कारवाई करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. कायमस्वरूपी शिक्षकांची नियुक्ती होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी गावातील सुशिक्षित तरुणांना तात्पुरते शिक्षक म्हणून नियुक्त करून ग्रामपंचायतीच्या निधीतून त्यांना मानधन देण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव लोकप्रतिनिधींनी मांडला. शाळेच्या सर्व प्रलंबित प्रश्नांवर प्रशासनासोबत सकारात्मक चर्चा झाली असून, शिक्षकांची उपलब्धता, इमारत दुरुस्ती आणि इतर आवश्यक बाबी लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी दिल्याची माहिती बैठकीनंतर देण्यात आली. त्यामुळे बेणसे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांवर लवकरच तोडगा निघेल, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# ‘ऑपरेशन म्यूल हंट’अंतर्गत १३२ गुन्हे दाखल

## सायबर गुन्ह्यांवर पुणे पोलिसांचा मोठा प्रहार

**पुणे (अभिजीत येरल्लू) :** सायबर फसवणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या बनावट बँक खात्यांचा पर्दाफाश करण्यासाठी पुणे पोलिसांच्या सायबर गुन्हे शाखेने राबविलेल्या ‘ऑपरेशन म्यूल हंट’ मोहिमेला वेग आला असून, या अंतर्गत शहरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये आतापर्यंत १३२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन महाराष्ट्र सायबर विभाग आणि इंडियन सायबर क्राईम कोऑर्डिनेशन सेंटरच्या सहकार्याने ‘एमआरएम’ (Money Restoration Module), ‘ई-झिरो




एफआयआर’, ‘जीआरएम’, ‘समन्वय’ आणि ‘सहयोग’ अशा विविध डिजिटल पोर्टलचा वापर करून सायबर गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवले जात आहे. आर्थिक आणि सायबर गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त विवेक मासाळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, ‘एमआरएम’ पोर्टलद्वारे आतापर्यंत २,३५८ तक्रारींची पडताळणी करण्यात आली असून, फसवणुकीची रक्कम परत मिळवून देण्यासाठी बँकांशी समन्वय साधला जात आहे. ‘ई-झिरो एफआयआर’ पोर्टलमुळे पाच लाख रुपयांवरील आर्थिक फसवणुकीच्या तक्रारी तातडीने नोंदवून तपास सुरू करता येतो. सायबर पोलिसांनी २०२४ पासून ‘समन्वय’ पोर्टलच्या माध्यमातून १५२ सायबर गुन्हेगारांना अटक केली असून, ‘सहयोग’ पोर्टलद्वारे समाजात तेढ निर्माण करणारे ८४५ आक्षेपार्ह संदेश हटविण्यात आले आहेत.

# ई-केवायसीशिवाय वेतन नाही; शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी शिक्षण विभागाचा इशारा



**नागपूर (नितीन देवळेकर) :** राज्यातील शालार्थ प्रणालीद्वारे वेतन घेणाऱ्या सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी ई-केवायसी (E-KYC) प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे. ऑगस्ट २०२६ (देय सप्टेंबर २०२६) च्या वेतन देयकापूर्वी ई-केवायसी पूर्ण न करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन रोखण्यात येईल, असा स्पष्ट इशारा शिक्षण संचालनालयाने दिला आहे. शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी ३१ जुलै रोजी यासंदर्भातील परिपत्रक जारी केले. वित्त विभागाच्या आढावा बैठकीतील निर्देशांनुसार हा निर्णय घेण्यात आला असून, अंशतः अनुदानित, खासगी अनुदानित तसेच जिल्हा परिषदांच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी लागणार आहे. प्रशासनाने यापूर्वी मे २०२६ पर्यंत ई-केवायसीसाठी मुदतवाढ दिली होती. मात्र आता कोणतीही अतिरिक्त मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच महाआयटीला शालार्थ प्रणालीमध्ये ई-केवायसी पूर्ण झाल्याशिवाय वेतन देयक तयार होणार नाही, अशी तांत्रिक व्यवस्था करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. वेतनात अडथळा येऊ नये यासाठी सर्व संबंधित शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तातडीने ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
दक्षिण मुंबई (विद्युत) सा.बां.विभाग, मुंबई
बांधकाम भवन, १ ला मजला, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-०१.

मेल पत्ता :- elsouthmumbai.ee@mahapwd.gov.in दूरध्वनी क्रमांक-०२२-२२००८४४८

ई निविदा सुचना क्र. १४ सन २०२६-२७

कार्यकारी अभियंता दक्षिण मुंबई (विद्युत) विभाग, सा.बां.विभाग, मुंबई फोर्ट, मुंबई, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून विद्युत अनुज्ञापतीधाकर कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता प्रारुप बी-१ नमून्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मार्गवित आहेत. निविदा कादपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता (वि), मुंबई प्रादेशिक विदयुत मंडळ, सा.बां. विभाग मुंबई यांना राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारण्यात येणार नाही.

**कामाचे नाव :१)** अंदाजपत्रक क्र. सीआर/मंत्रालय/एमएस/१०१६/२०२६-२७ मंत्रालय, मुंबई येथील मुख्य इमारतीमधील कॅबिनेट हॉल आणि माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व मुख्य सचिव यांच्या कार्यालयातील बैठक कक्षांमध्ये बसवण्यात आलेल्या ऑडिओ व व्हिडिओ प्रणालीची संपूर्ण देखभाल व संचालन सेवा पुरवणे (3 वर्षांसाठी).

**अंदाजित किंमत रुपये :** २,१७,०५,५५२/- (दोन कोटी सतरा लक्ष पाच हजार पाचशे बावन फक्त )

**ई- निविदा पुर्व बैठक वेळ व ठिकाण:-** दिनांक ०४.०८.२०२६ रोजी दुपारी १४:०० नंतर अर्धाक्षक अभियंता (वि), मुंबई प्रादेशिक विदयुत मंडळ, सा.बां. विभाग मुंबई.

**कामाचे नाव : २)** अंदाजपत्रक क्र. एसआर/ मंत्रालय/एमएस/१३०५/२०२६-२७ मंत्रालय, मुंबई येथील मुख्य इमारतीच्या ७ व्या मजल्यावरील 'कॅबिनेट हॉल' मधील व्हिडिओ वॉलचे नूतनीकरण व त्यामध्ये आवश्यक त्या विद्युत जोडण्यांसह बदल करणे.

**अंदाजित किंमत रुपये** ३,४७,६१,६४७/- (तीन कोटी सतेचाळीस लक्ष एकसष्ठ हजार सहाशे सतेचाळीस फक्त )

**ई- निविदा पुर्व बैठक वेळ व ठिकाण:-** दिनांक ०४.०८.२०२६ रोजी दुपारी १५:०० नंतर मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन, चौथा मजला, मझंबान रोड, फोर्ट, मुंबई.

**कामाचे नाव : ३)** अंदाजपत्रक क्र. एसआर/ मंत्रालय/ एमएलए /१९२७ & १९३१/ २०२४-२५ (A) फॉरेन्सिक सायन्स कॉलेज, मॅडम कामा रोड, कुलाबा, मुंबई - ४००००१ येथे बसविण्यात आलेल्या विद्यमान जुन्या व कालबाह्य विद्युत स्विचगिअर प्रणालीचे नूतनीकरण करणे. (ब) फॉरेन्सिक सायन्स कॉलेज, मॅडम कामा रोड, कुलाबा, मुंबई - ४००००१ येथे बसविण्यात आलेल्या नेटवर्किंग प्रणालीचे नूतनीकरण करणे.

**अंदाजित किंमत रुपये** १,३५,६७,४३७/- ( एक कोटी पसतीस लक्ष सदुसष्ठ हजार चारशे सदतीस फक्त )

**ई-निविदा उपलब्ध कालावधी :** दिनांक २९.०७.२०२६ दुपारी १३:०० पासून ते दिनांक ०६.०८.२०२६ रोजी दुपारी १३:०० वाजेपर्यंत

**ई-निविदा उघडणे व ठिकाण :** दिनांक ०७.०८.२०२६ रोजी दुपारी १४:०० नंतर अधीक्षक अभियंता (वि), मुंबई प्रादेशिक विदयुत मंडळ, सा.बां. विभाग मुंबई.

सविस्तर माहिती खालील प्रमाणे उपलब्ध आहे.

१. https://mahatenders.gov.in
**(सदर निविदासूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)**
२. कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई (विद्युत) विभाग, सा.बां.विभाग, मुंबई फोर्ट, मुंबई, कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र.-काअ/दमुविवि/नि.लि./४११२/२०२६-२७
दिनांक :-२३.०७.२०२६

कार्यकारी अभियंता
दक्षिण मुंबई विदयुत विभाग
सा. बां. विभाग, मुंबई

आरओसी - 2026-27/क्र- 5/C१९५२

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक(सा.बां.)विभाग, यांचे कार्यालय
Email : intergratedmumbai.ee@mahapwd.com
☎२२०१६९७४/७६
--

दरपत्रक सुचनापत्र क्रमांक ४

कार्यकारी अभियंता एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, मुंबई यांचे कार्यालयात संगणक व इतर अनुषांगिक साहित्याचा पुरवठा करण्याकरीता दिनांक ३१.०७.२०२६ ते ०७.०८.२०२६ रोजी पर्यंत ऑफलाईन पध्दतीने दर मागविण्यांत येत आहेत. प्राप्त दरपत्रके दिनांक १०.०८.२०२६ रोजी उघडण्यांत येतील. सदरील दर वस्तु व सेवा कर वगळून सादर करण्यांत यावे.

| अ.क्र. | मालाचे वर्णन | परिमाण | दरप्रती |
|---|---|---|---|
| 1. | All-in-one Computer Intel™ Core i5 Processor 13th Generation, 23.8” FHD Screen size, 16 GB DDR4 RAM, 512 GB SSD Hard Disk, with Three Side Micro Edge, FHD Web Camera, Wi-Fi & Bluetooth, Wireless Keyboard & Mouse, 1 year company warranty Make HP Natural. | 1 Nos | Per Nos |
| 2. | 3 years Additional Extended Hardware Warranty. | 1 Nos | Per Nos |
| 3. | Windows 11 Pro (Licensed). | 1 Nos | Per Nos |
| 4. | Microsoft 365 Office 2024 (Licensed). | 1 Nos | Per Nos |
| 5. | Quick Heal Total Security Anti Virus 3 Years. | 1 Nos | Per Nos |
| 6. | All-in-One Laser Printer with Print, Copy, Scan with duplex • Print Speed (A4): up to 27ppm • FPOT (A4): 6.0secs. • Print Resolution: Up to 1200 x 1200dpi. | 1 Nos | Per Nos |

अटी व शर्ती :-

१. दरपत्रके सिलबंद पाकिटात आणि कंपनीच्या नाममुद्रीत पत्रावर सादर करावीत.वर नमुद केलेल्या दिनांक आणि वेळेनंतर दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.
२. दरपत्रकातील दर वस्तु व सेवा कर वगळून सादर करावे तसेच नमुद केलेल्या ठिकाणापर्यंततच्या वाहतुकीच्या खर्चाचा अंतर्भाव केलेली असावीत.
३. कोणतेही कारण न देता दरपत्रक नामंजुर करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवलेला आहे.
४. दरपत्रकांसोबत वस्तु व सेवा कर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.
५. दुकाने व आस्थापणे प्रमाणपत्र (शॉप ॲक्ट) सोबत सादर करणे बंधनकारक आहे.

जा.क्र. काअ/एघवि/भांडार/ई-निविदा/ ४२५७
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.)विभाग, बांधकाम भवन, २ रा मजला, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६.
दिनांक :-२८/०७/२०२६.

(उदय डी.पालवे)
कार्यकारी अभियंता
एकात्मिकृत घटक(सा.बां.)विभाग,
मुंबई

आरओसी - 2026-27/क्र- 5/C२०१७

# रश्मिका मंदानाला शूटिंगदरम्यान गंभीर दुखापत

## सहा आठवड्यांसाठी चित्रीकरणाला ब्रेक



**वृत्तसंस्था :** दाक्षिणात्य आणि बॉलिवूड चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री रश्मिका मंदाना हिच्या चाहत्यांसाठी चिंताजनक बातमी समोर आली आहे. एका मोठ्या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान कठीण ॲक्शन आणि डान्स सिक्वेन्स साकारताना तिच्या कमरेजवळ गंभीर दुखापत झाली आहे. या दुखापतीनंतर डॉक्टरांनी तिला पुढील सहा आठवडे संपूर्ण विश्रांती, फिजिओथेरपी आणि पुनर्वसन (रिहॅबिलिटेशन) करण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे तिच्या आगामी चित्रपटांचे तसेच जाहिरातींचे शूटिंग काही काळासाठी पुढे ढकलले जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रश्मिका सध्या तिच्या महत्त्वाकांक्षी 'रणबाली' आणि 'मैसा' या चित्रपटांच्या चित्रीकरणात व्यस्त होती. या चित्रपटांतील आव्हानात्मक ॲक्शन दृश्ये आणि सलग डान्स रिहर्सलदरम्यान तिच्या कमरेच्या हाडाजवळ दुखापत झाली. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारची दुखापत प्रामुख्याने अत्यंत कठोर शारीरिक मेहनत घेणाऱ्या खेळाडूंमध्ये किंवा सतत ॲक्शन दृश्ये करणाऱ्या कलाकारांमध्ये आढळते. त्यामुळे पूर्ण बरे होण्यासाठी विश्रांतीसोबतच नियमित फिजिओथेरपी आवश्यक असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले आहे. रश्मिकाकडे सध्या अनेक पॅन-इंडिया चित्रपटांची जबाबदारी आहे. याशिवाय ती देश-विदेशातील ३० हून अधिक नामांकित ब्रँड्सची ब्रँड ॲम्बेसेडर असल्याने जाहिरातींचे अनेक प्रकल्पही तिच्याकडे आहेत. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार ती काही आठवडे कॅमेऱ्यापासून दूर राहणार असल्याने निर्मात्यांना चित्रीकरणाचे वेळापत्रक बदलावे लागणार आहे. त्यामुळे काही चित्रपटांच्या प्रदर्शनाच्या तारखांवरही परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. रश्मिकाच्या दुखापतीची माहिती सोशल मीडियावर समोर येताच चाहत्यांनी तिच्या प्रकृतीबद्दल चिंता व्यक्त केली. अनेक कलाकार, दिग्दर्शक आणि चाहत्यांनी तिने लवकरात लवकर पूर्णपणे बरे व्हावे, अशा शुभेच्छा दिल्या. तिच्या पोस्टवर 'गेट वेल सून' अशा हजारो प्रतिक्रिया उमटत असून, चाहत्यांकडून सातत्याने तिच्या प्रकृतीची विचारपूस केली जात आहे. 'नॅशनल क्रश' म्हणून ओळख मिळवलेल्या रश्मिका मंदानाने अल्पावधीतच दक्षिण भारतीय चित्रपटांसह हिंदी चित्रपटसृष्टीतही स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. तिच्या आगामी चित्रपटांकडे प्रेक्षकांचे मोठे लक्ष लागले असून, ही दुखापत लवकर बरी होऊन ती पुन्हा जोमाने चित्रीकरणाला सुरुवात करेल, अशी अपेक्षा तिच्या चाहत्यांकडून व्यक्त केली जात आहे. तिच्या प्रकृतीवर सध्या डॉक्टरांचे बारकाईने लक्ष असून, पूर्णपणे तंदुरुस्त झाल्यानंतरच ती पुन्हा शूटिंगला परतणार असल्याची माहिती समोर आली आहे.

# क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या लढ्याचा इतिहास रुपेरी पडद्यावर; 'पत्री सरकार १९४२'चे पहिले पोस्टर प्रदर्शित




**वृत्तसंस्था :** भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एका महत्त्वपूर्ण आणि दुर्लक्षित अध्यायाला मोठ्या पडद्यावर जिवंत करण्यासाठी सज्ज झालेल्या 'पत्री सरकार १९४२' या आगामी मराठी चित्रपटाचे पहिले अधिकृत पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. पोस्टर प्रसिद्ध होताच सोशल मीडियावर त्याची जोरदार चर्चा सुरू झाली असून, चित्रपटाच्या भव्य मांडणीची आणि ऐतिहासिक आशयाची झलक पाहून प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढली आहे. हा चित्रपट १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सातारा जिल्ह्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या प्रतिसरकार अर्थात 'पत्री सरकार'च्या थरारक इतिहासावर आधारित आहे. इंग्रजांच्या दडपशाहीविरोधात उभ्या राहिलेल्या या चळवळीने ब्रिटिश सत्तेला मोठे आव्हान निर्माण केले होते. जी. डी. लाड, नागनाथ नायकवडी यांच्यासह अनेक क्रांतिकारकांनी स्वातंत्र्यासाठी दिलेला संघर्ष आणि त्याग या चित्रपटातून प्रभावीपणे मांडण्यात येणार आहे. चित्रपटाच्या पहिल्या पोस्टरमध्ये हातात बंदूक घेतलेला क्रांतिकारक, घोड्यावर स्वार योद्धा, ब्रिटिश सैनिकांशी सुरू असलेला संघर्ष, धुराचे लोट आणि ज्वालांनी वेढलेली रणभूमी अशा दृश्यांमधून स्वातंत्र्यलढ्याचा जाज्वल्य आवेश टिपण्यात आला आहे. पोस्टरची कलात्मक मांडणी आणि ऐतिहासिक वातावरणामुळे हा चित्रपट भव्य प्रमाणात साकारण्यात आल्याची झलक मिळते. 'भागीरथी मोशन पिक्चर' च्या बॅनरखाली विशाल गोविंदराव जाधव यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाचे लेखन, गीत, संगीत, पटकथा आणि दिग्दर्शनाची जबाबदारी मनीष अनसुरकर यांनी सांभाळली आहे. संकलन कर्तव्य मोकल यांनी केले असून, संदीप वाटवे, सुमेध मराठे आणि परमहंस पाठक यांनी छायांकन केले आहे. पार्श्वसंगीत सौरभ लता शिवकुमार यांनी दिले असून, विशाल जाधव, गोरख गुंजाळ, अनन्या नाईक आणि आनंद मेनन यांच्या आवाजात चित्रपटातील गाणी साकारली आहेत. दिग्दर्शक मनीष अनसुरकर यांनी सांगितले की, क्रांतिसिंह नाना पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उभारलेल्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. ऐतिहासिक घटनांची सत्यता कायम ठेवत चित्रपट अधिक प्रभावी आणि प्रेरणादायी बनविण्यावर भर देण्यात आला आहे. पोस्टरनंतर लवकरच चित्रपटाचा टीझर आणि ट्रेलरही प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, त्यातून या ऐतिहासिक चित्रपटाची अधिक झलक पाहायला मिळणार आहे. 'पत्री सरकार १९४२' हा चित्रपट स्वातंत्र्यलढ्यातील विस्मरणात गेलेल्या शौर्यगाथेला नव्याने उजाळा देणारा ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# "मी नसतानाही भारताकडे विजेते तयार आहेत"



**वृत्तसंस्था :** कॉमनवेल्थ गेम्स २०२६ स्पर्धेत भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा याने रौप्यपदक जिंकत आणखी एक ऐतिहासिक कामगिरी आपल्या नावावर केली. सुवर्णपदकाची अपेक्षा असतानाही नीरजला यावेळी रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. मात्र पदकानंतर त्याने केलेले विधान भारतीय ॲथलेटिक्ससाठी मोठा आशावाद निर्माण करणारे ठरले आहे. "मी मैदानावर नसलो किंवा जखमी असलो तरी भारताकडे आता उत्कृष्ट भालाफेकपटूंची फळी तयार झाली आहे," असे सांगत त्याने नव्या पिढीच्या खेळाडूंचे कौतुक केले. ग्लासगो येथे सुरू असलेल्या स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी दमदार कामगिरी करत पदकांची लय कायम राखली आहे. भालाफेकच्या अंतिम फेरीत भारताचे तीन खेळाडू उतरले होते. त्यापैकी नीरज चोप्राने रौप्य, तर यशवीर सिंगने कांस्यपदक पटकावले. रोहित यादवनेही चांगली झुंज दिली; मात्र त्याला पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागले. या कामगिरीमुळे कॉमनवेल्थ गेम्सच्या इतिहासात सुवर्ण आणि रौप्य अशी दोन्ही पदके जिंकणारा नीरज चोप्रा हा पहिला भारतीय भालाफेकपटू ठरला आहे. पदक वितरणानंतर बोलताना नीरज म्हणाला, "आज मला आशियाई क्रीडा स्पर्धेच्या आठवणी ताज्या झाल्या. त्या वेळीही भारतीय खेळाडूंनी एकत्रितपणे शानदार कामगिरी केली होती. यशवीरने निर्णायक क्षणी वैयक्तिक सर्वोत्तम थ्रो करत कांस्यपदक जिंकले, याचा मला विशेष आनंद आहे. एकाच पोडियमवर दोन भारतीय खेळाडूंना पाहणे ही अभिमानाची बाब आहे." त्याने पुढे सांगितले की, "या हंगामातील माझी ही सर्वोत्तम कामगिरी आहे. दुखापतीतून पुनरागमन केल्यानंतर मी योग्य दिशेने वाटचाल करत आहे. अजून अनेक मोठ्या स्पर्धा बाकी आहेत आणि त्यासाठी मी अधिक मेहनत घेणार आहे. सर्वात मोठा आनंद म्हणजे भारतात भालाफेकीत नवे खेळाडू सातत्याने पुढे येत आहेत. यशवीरने ८५ मीटर क्लबमध्ये प्रवेश केला आहे, तर रोहितही सातत्याने चांगली कामगिरी करत आहे. भविष्यात भारताला या खेळात आणखी मोठे यश मिळेल, याचा मला विश्वास आहे." स्पर्धेतील आपल्या कामगिरीबाबत बोलताना नीरजने कबूल केले की, अपेक्षेप्रमाणे सर्वोत्तम थ्रो करता आला नाही. "आज फक्त एकच थ्रो समाधानकारक झाला. इतर प्रयत्न अधिक चांगले होऊ शकले असते. थंड हवामानात खेळणे माझ्यासाठी नेहमीच आव्हानात्मक ठरते. मला उबदार वातावरणात अधिक चांगली कामगिरी करता येते," असे त्याने स्पष्ट केले. अंतिम फेरीत नीरजने सहा प्रयत्नांपैकी दुसऱ्या प्रयत्नात ८५.८३ मीटर अंतर गाठत सर्वोत्तम थ्रो नोंदवला.



# फॅटी लिव्हरवर घरगुती उपायांचा आधार; धणे, हळद आणि काळी मिरी किती फायदेशीर?

**वृत्तसंस्था :** फॅटी लिव्हरची समस्या सध्या झपाट्याने वाढत असून, चुकीची जीवनशैली, असंतुलित आहार आणि वाढते वजन ही त्यामागील प्रमुख कारणे मानली जातात. यकृताच्या पेशींमध्ये अतिरिक्त चरबी साचल्याने ही समस्या उद्भवते. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी औषधांसोबतच संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि वजन नियंत्रण महत्त्वाचे ठरते. भारतीय स्वयंपाकघरातील धणे, हळद आणि काळी मिरी यांसारखे मसाले आरोग्यास पूरक असले तरी ते चमत्कारी उपचार नाहीत, असे तज्ज्ञांचे मत आहे.

■ धणे हा भारतीय आहारातील महत्त्वाचा घटक आहे. त्यामध्ये अँटिऑक्सिडंट आणि वनस्पतीजन्य घटक आढळतात. धण्याचे पाणी पचनक्रिया सुधारण्यास आणि शरीरातील नैसर्गिक चयापचय प्रक्रियेला मदत करू शकते, अशी धारणा आहे. मात्र, केवळ धण्याचे पाणी पिल्याने यकृतातील चरबी कमी होते, असा कोणताही ठोस वैज्ञानिक पुरावा उपलब्ध नाही. त्यामुळे धण्याचा वापर संतुलित आहाराचा भाग म्हणूनच करावा.

■ हळदीतील कर्क्युमिन हा घटक दाहशामक आणि अँटिऑक्सिडंट गुणधर्मांसाठी ओळखला जातो. शरीरातील दाह आणि ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो. काही संशोधनांमध्ये कर्क्युमिनचे सकारात्मक परिणाम दिसून आले असले, तरी हळदीचे सप्लिमेंट किंवा मोठ्या प्रमाणात सेवन करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे, विशेषतः यकृताचे आजार किंवा इतर औषधे सुरू असतील तर.

■ काळ्या मिरीमध्ये असलेला पाइपरीन हा घटक काही पोषक तत्त्वांचे शोषण वाढवण्यास मदत करतो. त्यामुळे हळद आणि काळी मिरी एकत्र वापरण्याची पारंपरिक पद्धत प्रचलित आहे. तथापि, हे मिश्रणही औषधांचा पर्याय ठरू शकत नाही.

तज्ज्ञांच्या मते, फॅटी लिव्हरवर नियंत्रण मिळवण्यासाठी साखर, जास्त तेलकट आणि प्रक्रिया केलेले पदार्थ कमी करणे आवश्यक आहे. त्याऐवजी फळे, भाज्या, संपूर्ण धान्य, पुरेसे प्रथिने आणि संतुलित आहाराचा समावेश करावा. नियमित चालणे, योगासने किंवा इतर व्यायामामुळे वजन नियंत्रणात राहते आणि यकृताचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. धणे, हळद आणि काळी मिरी यांसारखे नैसर्गिक पदार्थ आरोग्यदायी जीवनशैलीचा भाग असू शकतात; मात्र फॅटी लिव्हरवर मात करण्यासाठी केवळ घरगुती उपायांवर अवलंबून राहणे योग्य नाही. डॉक्टरांचा सल्ला, आवश्यक तपासण्या, औषधोपचार आणि जीवनशैलीतील सकारात्मक बदल यांचा समतोल राखल्यासच फॅटी लिव्हरवर प्रभावी नियंत्रण मिळवता येऊ शकते.

# सलमान खानचा अस्सलपणा Gen Z ला भावतो, असे त्याच्या ट्विट्सचा संग्रह असलेल्या 'भाई के दोहे'च्या निर्मात्यांनी सांगितले

**वृत्तसंस्था :** सलमान खानचे ट्वीट्स (आता एक्स पोस्ट्स) आणि इन्स्टाग्राम कॅप्शन्स हे त्याच्यातील विचित्रपणा, विनोदबुद्धी आणि खास शैलीचा खजिना आहेत, ज्यामुळे इंटरनेटला त्याचे आकर्षण वाटल्याशिवाय राहत नाही. सोनम वांगचुकसाठीचे त्याचे 'इट्स डन ब्रो' हे कॅप्शन असो, एकटेपणावरचा त्याचा अनोखा दृष्टिकोन असो, किंवा अगदी अलीकडची, संजय दत्त उर्फ संजू बाबासाठी लिहिलेली त्याची हृदयस्पर्शी चिठ्ठी असो, हा अभिनेता आपल्या खास लेखनशैलीने नेहमीच आश्चर्यचकित करतो. त्याचे पुढचे ट्वीट किंवा इन्स्टा कॅप्शन कशाबद्दल असेल, हे कधीच सांगता येत नाही. आता, दोन विद्यार्थ्यांमुळे सलमान खानचे हे शहाणपणाचे बोल एका पुस्तकाच्या संग्रहात उपलब्ध झाले आहेत. इंदूरचा रहिवासी असलेला २१ वर्षीय प्रथम सोलंकी आणि पुण्याचा रहिवासी असलेला २२ वर्षीय सोहम बोडके यांनी सलमान खानचे ट्वीट्स आणि इन्स्टा कॅप्शन्स यांचे रूपांतर 'भाई के दोहे' नावाच्या पुस्तकात करून गेल्या महिन्यात ते प्रकाशित केले. सहज सुचलेल्या एका कल्पनेतून सुरू झालेली ही गोष्ट सोशल मीडियावर अचानक खूप लोकप्रिय झाली आणि मिळालेल्या प्रतिसादाने ते दोघेही आश्चर्यचकित झाले आहेत. "माझा उद्देश स्वतःसाठी पुस्तक बनवण्याचा होता, ते विकण्याचा नाही, पण जेव्हा मी ते स्टोरीवर टाकले, तेव्हा त्याला खूप चांगला प्रतिसाद मिळाला," असे प्रथमने हिंदुस्तान टाइम्सला सांगितले. व्हर्च्युअल जगात सलमानने मांडलेल्या विचारांची मांडणी करणाऱ्या पुस्तकामागील प्रेरणा सांगताना,



प्रथम म्हणाला, "मैं बचपन से सलमान सर का फॅन हूं, तो इस लिए ये बुक का आयडिया आया था. वो कोई आई या व्यावसायिक भाषा का उपयोग नहीं करते. वो अपने मन की बात लिखते हैं, वो अपने मन की बात करते हैं. hain (मी लहानपणापासून सलमान सरांचा चाहता आहे, आणि त्यामुळेच मला या पुस्तकाची कल्पना सुचली. तो एआय किंवा कोणतीही व्यावसायिक भाषा वापरत नाही. त्याच्या मनात जे काही येते, ते जसेच्या तसे, अगदी हृदयापासून तो लिहितो. सोहम पुढे म्हणाला, "हीच गोष्ट त्याला इतर कलाकारांपेक्षा वेगळी ठरवते, आणि आम्हा Gen-Z ला सुद्धा हीच गोष्ट आवडते; म्हणजे खरं आणि अस्सल असणं. भाई खरंच




खरा आहे." पुस्तकाची मागणी वाढली असून, त्यांची पहिली खेप एका दिवसातच विकली गेली. ही गोष्ट त्यांना अपेक्षित नव्हती. "मला इंदूरहून पुण्याला स्थलांतरित व्हावे लागले," असे प्रथम हसत म्हणाला. त्यावर सोहम पुढे म्हणाला, "४८ तास आम्ही झोपलो नाही, कारण आम्ही फक्त ऑर्डर्स पॅक करून पाठवत होतो. आमची पहिली खेप विकली जाईपर्यंत, भाईने 'झालं ब्रो' असं ट्विट केलं, म्हणून आम्ही त्याचाही पुस्तकात समावेश केला." जसजसा वेळ जाईल, तसतसे या दोघांना सिक्वेलसाठी अधिक साहित्य गोळा करण्याची आशा आहे, जे त्यांना शक्य वाटते. सध्या तरी, त्यांची फक्त एकच इच्छा आहे. सोहम म्हणाला, "आम्हाला खरंच आशा आहे की हे पुस्तक सलमान सरांपर्यंत पोहोचावं." प्रथम गंमतीने म्हणाला, "आमचा तर प्लॅन होता त्यांच्या घरापर्यंत एक पुस्तक पोहोचवायचं, पण आता सुरक्षा खूपच कडक आहे." सलमान खान सध्या वामशी पैडीपल्ली दिग्दर्शित आणि नयनतारासोबतच्या त्याच्या आगामी चित्रपटाच्या कामात व्यस्त आहे. या अभिनेत्याचा 'मातृभूमी' हा चित्रपटही प्रदर्शनासाठी सज्ज आहे. मात्र, निर्मात्यांनी अद्याप प्रदर्शनाची तारीख जाहीर केलेली नाही.

# मुलांमध्येही वाढतोय थायरॉईडचा धोका

**वृत्तसंस्था :** थायरॉईड हा आजार केवळ प्रौढ किंवा तरुणांपुरता मर्यादित नसून लहान मुलांनाही त्याचा धोका वाढत असल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. मुलांच्या वाढीवर, मेंदूच्या विकासावर आणि दैनंदिन ऊर्जेवर थायरॉईड हार्मोन्सचा थेट परिणाम होत असल्याने पालकांनी काही महत्त्वाच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये, असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. तज्ज्ञांच्या मते, मुलांमध्ये विशेषतः हायपोथायरॉईडीझम ही समस्या आढळू शकते. या स्थितीत थायरॉईड ग्रंथी आवश्यक तेवढे हार्मोन्स तयार करत नाही. परिणामी मुलांची शारीरिक वाढ मंदावणे, अभ्यासात लक्ष न लागणे, सतत थकवा जाणवणे आणि वजनात अनपेक्षित बदल होणे अशी लक्षणे दिसू शकतात. मुलाच्या वयानुसार उंची वाढत नसेल, पौगंडावस्था उशिरा येत असेल किंवा त्याला नेहमीपेक्षा अधिक थकवा जाणवत असेल, तर त्यामागे थायरॉईडची समस्या असू शकते. याशिवाय शाळेत लक्ष केंद्रित करण्यात अडचण, स्मरणशक्ती कमी होणे आणि अभ्यासातील कामगिरी घसरणे ही देखील महत्त्वाची संकेत आहेत. तसेच वजन वाढणे, बद्धकोष्ठता, जास्त थंडी वाजणे, त्वचा कोरडी पडणे किंवा मानेच्या पुढील



भागात सूज दिसणे ही लक्षणेही दुर्लक्षित करू नयेत. मुलींप्रमाणेच मुलांनाही थायरॉईडचा त्रास होऊ शकतो, हे पालकांनी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. डॉक्टरांच्या मते, थायरॉईडचे निदान साध्या रक्त तपासणीद्वारे करता येते आणि वेळेवर उपचार सुरू केल्यास मुलांची वाढ व विकास सामान्य राहू शकतो. त्यामुळे वरीलपैकी अनेक लक्षणे एकाच वेळी दिसल्यास विलंब न करता बालरोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. नियमित तपासणी आणि योग्य उपचारांमुळे हा आजार प्रभावीपणे नियंत्रणात ठेवता येतो.

**महाराष्ट्र शासन**
इलाखा शहर विभाग, (सा.बां.)
ई -निविदा सुचना क्र. ३१ सन २०२६-२७

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) हे सक्षम व अनुभवी कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | मादाम कामा रोड मुंबई येथील नविन प्रशासकिय इमारतीच्या १९ व्या मजल्यावरील सामान्य प्रशासन विभाग कार्यालयाचे दुरुस्ती आणि नुतनीकरण करणे. | २,४९,४२,६५९/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. ३१.७.२०२६ ते दि. १०.८.२०२६ पर्यंत

निविदा पूर्व बैठक- दि. ५.८.२०२६ (बैठकिचे ठिकाण अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय, ५ बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ वेळ : ३.०० वाजता)

ई-निविदा उघडणे- दि. ११.८.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता

निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल. खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्रं. इशवि/निलि/ ५७४३
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक २०/७/२०२६

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

आरओसी - 2026-27/क्र- 5/C२०१४

# गुटखा पान मसाला कंपनी वरती छापा

## ■ कुळगाव व मुरबाड पोलिसांची धडक कारवाई
## ■ कान्होर येथे सुरू असलेल्या प्रतिबंधित गुटखा पान मसाल्याच्या कारखान्यावर छापा, ४ लाख ३३ हजारांचा मुद्देमाल जप्त ३ जण अटक



■ **मुरबाड (विशेष प्रतिनिधी) :** ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड यांनी जिल्ह्यात गुटखा, गांजा व अंमली पदार्थांचा अवैध व्यवसाय करणाऱ्या इसमांविरुद्ध कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाचे पालन करत कुळगाव पोलिसांनी एका अवैध कारखान्यावर मोठी कारवाई केली आहे.दिनांक २९/०७/२०२६ रोजी कुळगाव पोलीस ठाणे हद्दीतील कान्होर गावाजवळील 'साद फार्महाऊस'वर काही जण प्रतिबंधित असलेला पानमसाला व सुगंधी तंबाखू मसाला तयार करून त्याची विक्रीकरिता साठवणूक करत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी रात्री ०९:०० वाजता सदर फार्महाऊसवर छापा टाकला. या कारवाईदरम्यान तीन इसम मिळून आले. त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांच्या ताब्यात असलेल्या गोणींमध्ये स्वाद व सुगंधी 'RAJ SUPARI' असा एकूण ३१८७ पाऊचचा साठा आढळून आला. तसेच हा प्रतिबंधित सुगंधी तंबाखू मसाला मशिनच्या साहाय्याने तयार करून साठा केल्याचे तपासात निष्पन्न झाले.पोलिसांनी घटनास्थळावरून एकूण ४,३३,१८७ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी कुळगाव पोलीस ठाण्यात गु.र.नं. २२३/२०२६ अन्वये अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ चे कलम २६(२)(i), २६(२)(iv), २७(३)(e), ३०(२)(a), ५९ आणि भारतीय न्याय संहितेच्या कलम- १२३, २२३, २७४, २७५, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक करण्यात आलेले आरोपी १. फिराज सज्जाद खान (वय २७ वर्षे) २. साहिल मुन्शी खान (वय १८ वर्षे) ३. अरबाज निजाम खान (वय २३ वर्षे) सर्व राहणार बदलापूर गाव, मुस्लिम मोहल्ला, ता. अंबरनाथ, जि. ठाणे ह्या सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर धडक कारवाई पोलीस अधीक्षक श्री. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल, मुरबाड उपविभागीय पोलीस अधिकारी, अनिल लाड यांच्या मार्गदर्शनाखाली कुळगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उपनिरीक्षक प्रशांत चव्हाण, पो.हवा. किरण खडताळे, पो.हवा बाबू पवार, पो.हवा. दत्ता गावारी, पो.ना. सोमनाथ मोरे, नरेंद्र कोळी, पो.शि. सचिन जाधव, पो.शि. अविनाश वाकचौरे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रशांत सुभाष चव्हाण करत आहेत.

# नागपुरात ४३.७४ लाखांचा एमडी ड्रग्ज साठा जप्त



■ **नागपूर (विशेष प्रतिनिधी) :** नागपूर शहरात अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत १५१ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) ड्रग्जसह तब्बल ४३ लाख ७४ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत दोन सराईत आरोपींना अटक करण्यात आली असून, या रॅकेटमधील एका फरार आरोपीचा शोध पोलीस घेत आहेत. या कारवाईमुळे शहरातील अमली पदार्थांच्या पुरवठा साखळीला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे. गुन्हे शाखेच्या युनिट-३ पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे भांडेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वैष्णवी देवी नगर परिसरात 'विस्टा टॅटू स्टुडिओ'जवळ सापळा रचण्यात आला होता. संशयितांच्या हालचालींवर लक्ष ठेवून पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर एनडीपीएस कायद्यातील सर्व नियमांचे पालन करत पंचांसमक्ष त्यांची झडती घेण्यात आली.झडतीदरम्यान आरोपींकडून ३० लाख २० हजार रुपये किमतीची १५१ ग्रॅम एमडी पावडर जप्त करण्यात आली. याशिवाय दोन मोबाईल फोन, एक इलेक्ट्रॉनिक वजनकाटा, ३ हजार ६०० रुपयांची रोख रक्कम, एक होंडा सिटी कार आणि एक सुझुकी ॲक्सेस दुचाकी असा एकूण ४३ लाख ७४ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. या प्रकरणी मोहम्मद नियाज समसूल अन्सारी (३४) आणि मोहम्मद असलम समसूल अन्सारी (३४) या दोघांना अटक करण्यात आली आहे. प्राथमिक तपासात दोघांवर यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे समोर आले आहे. या रॅकेटमधील विशाल उर्फ फल्ली गुप्ता हा आरोपी मात्र पोलिसांना चकवा देऊन पसार झाला असून त्याचा शोध घेण्यासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत. या प्रकरणी भांडेवाडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता तसेच एनडीपीएस कायद्यातील कलम ८(क), २२(क) आणि २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# FDAची धडक कारवाई; बंदी असलेल्या पाकिस्तानी सौंदर्यप्रसाधनांचा साठा जप्त

■ **अहिल्यानगर (विशेष प्रतिनिधी) :** अन्न व औषध प्रशासन (FDA) चे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभर हॉटेल, दूध डेअरी आणि खाद्य उत्पादक कारखान्यांवर धडक कारवाया सुरू केल्या असून, आता अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथे करण्यात आलेल्या कारवाईत बंदी असलेल्या पाकिस्तानी सौंदर्यप्रसाधनांचा साठा जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने (FDA) संगमनेर शहर पोलिसांच्या मदतीने शनिवारी (१ ऑगस्ट) दुपारी गोल्डन मार्केटमधील एका दुकानावर छापा टाकला. या छाप्यामध्ये पाकिस्तानात तयार होणारी 'गोरी ब्युटी क्रीम' आणि 'गोरी डे अँड नाईट क्रीम' ही उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे आढळून आले. कारवाईदरम्यान तब्बल १२ हजार ९०० रुपयांचा पाकिस्तानी सौंदर्यप्रसाधनांचा साठा



जप्त करण्यात आला. या प्रकरणी औषध निरीक्षक सोमनाथ मुळे यांच्या फिर्यादीवरून पुढील कारवाई करण्यात आली असून, संबंधित दुकानदार शाहीद रियाज शेख याला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या क्रीमच्या पॅकेजिंगवर "Made in Pakistan / Pakistan Standard" असा स्पष्ट उल्लेख आढळून आला. तपासादरम्यान भारतात विक्रीसाठी आवश्यक असलेली परवानगी न घेता ही सौंदर्यप्रसाधने विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी संबंधित दुकानदाराविरुद्ध संगमनेर शहर पोलीस ठाण्यात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, अन्न व औषध प्रशासनाकडून पुढील तपास सुरू आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, ही सौंदर्यप्रसाधने मानवी आरोग्यास अपायकारक ठरू शकतात. त्यामुळे नागरिकांनी, विशेषतः महिलांनी, कोणतेही सौंदर्यप्रसाधन खरेदी करण्यापूर्वी ते कोणत्या कंपनीचे आहे, कोणत्या देशात तयार झाले आहे आणि त्याला आवश्यक परवानग्या आहेत का, याची खातरजमा करूनच खरेदी करावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी केले आहे.

# तीन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर न्यायाची दिशा; नवजात मृत्यूप्रकरणी डॉक्टरांवर गुन्हा

■ **अलिबाग (विशेष प्रतिनिधी) :** अलिबाग जिल्हा रुग्णालयातील प्रसूतीदरम्यान नवजात बाळाच्या मृत्यूप्रकरणी तब्बल तीन वर्षांनंतर महत्त्वाची कारवाई करण्यात आली आहे. सर जे.जे. समूह रुग्णालय, मुंबई येथील पाच तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीने कर्तव्यातील हलगर्जीपणा आणि निष्काळजीपणा स्पष्ट केल्यानंतर डॉ. प्रियल रवींद्र शेंडे यांच्याविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे वैद्यकीय निष्काळजीपणाच्या प्रकरणांकडे पुन्हा एकदा गंभीरपणे लक्ष वेधले गेले आहे. बेलोशी येथील सुष्मिता रुपेश काटले यांना १४ मे २०२२ रोजी प्रसूतीसाठी अलिबाग जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्रसूतीदरम्यान गुंतागुंत निर्माण झाल्यानंतर ऑनड्युटी डॉक्टरांना पाचारण करण्यात आले. मात्र, संबंधित डॉक्टर रुग्णालयात उपस्थित नसल्याचा आरोप तक्रारीत



करण्यात आला आहे. बाळाचे डोके प्रसूतीमार्गात अडकल्यानंतर आवश्यक उपचार वेळेत न मिळाल्याने नवजात बाळाचा मृत्यू झाल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. या घटनेनंतर २०२२ मध्ये आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. त्यानंतर वैद्यकीय कागदपत्रे सर जे.जे. समूह रुग्णालयातील पाच तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीकडे तपासणीसाठी पाठविण्यात आली. समितीचा अहवाल २७ जुलै २०२६ रोजी अलिबाग पोलिसांना प्राप्त झाला. अहवालातील निष्कर्षांच्या आधारे डॉ. प्रियल शेंडे यांच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला. तज्ज्ञ समितीने आपल्या अहवालात प्रसूतीसारख्या गंभीर परिस्थितीत संबंधित डॉक्टरांचे कर्तव्यावर उपस्थित राहणे आवश्यक असतानाही त्या अनुपस्थित असल्याचे नमूद केले आहे. आवश्यक वैद्यकीय उपचार वेळेत न मिळाल्याने नवजात बाळाचा मृत्यू झाल्याचा ठपकाही समितीने ठेवला असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पीडित माता सुष्मिता काटले म्हणाल्या, "माझे बाळ मला परत मिळणार नाही. मात्र, या प्रकरणात न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या जे.जे. रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टर, अलिबाग पोलीस आणि जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांचे मी मनापासून आभार मानते. भविष्यात कोणत्याही आईवर अशी वेळ येऊ नये, यासाठी शासनाने वैद्यकीय हलगर्जीपणाविरोधात कठोर कायदे करावेत." सामाजिक कार्यकर्ते ॲड. राकेश नारायण पाटील यांनी सांगितले,

# अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार : तिघेजण अटकेत

■ **डोंबिवली (विशेष प्रतिनिधी) :** डोंबिवलीत अतिशय धक्कादायक प्रकार समोर आलाय. एका अल्पवयीन मुलीवर तिघांनी सामूहिक अत्याचार केल्याची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणात तिघांना मानपाडा पोलिसांनी ताब्यात घेतलं असून पुढील तपास सुरू केला आहे. डोंबिवली पूर्वेतील मानपाडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत एक 16 वर्षीय अल्पवयीन मुलगी घरातून बेपत्ता झाली होती भाऊजइ सोबत वाद झाल्याने एका व्यक्तीसोबत ती घरातून निघून गेली. बदलापूर काटई रस्त्यावर एका चायनिज हॉटेल मध्ये जेवण घेण्यासाठी गेली असता या अल्पवयीन मुलीकडे पैसे नसल्याने हॉटेल चालकांनी तिला काही तरी खायला दिले. हॉटेल चालक अंगूर ठाकूर याने अल्पवयीन मुलीची मदत करण्याच्या नावाखाली तिचा विश्वास संपादन केला. अंगूर ठाकूर



**काही दिवसापासून घरातून बेपत्ता होती अल्पवयीन मुलगी**

याने या परिसरात राहणाऱ्या दोन अल्पवयीन तरुणांसोबत या मुलीची ओळख करून दिली. अल्पवयीन मुलीने या तिघांना आपली व्यथा सांगितली. ती घरातून निघून आली आहे. या तिघांनी तिला कामावर लावून देतो आणि राहायला घर पण देतो असे सांगून एका निर्जन ठिकाणी घेऊन गेले. तिघांनी या अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार केला. घडलेला प्रकरणानंतर तिन्हींनराधमांनी या मुलीला रस्त्यावर सोडून दिले. ही मुलगी कुळगाव बदलापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत पोहोचली त्या ठिकाणी काही नागरिकांनी या मुलीला पोलिसांच्या ताब्यात दिलं. या मुलीने घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला. घरातून निघून गेल्याने मानपाडा पोलीस स्टेशनमध्ये या संदर्भात अपहरणाचा गुन्हा दाखल होता, त्यामुळे याची माहिती मानपाडा पोलिसांना मिळाली त्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्र फिरवले आणि तिन्ही नराधमांना ताब्यात घेतले. यामध्ये अंगूर ठाकूर हा 22 वर्षाचा चायनिज हॉटेल चालक आहे तर इतर दोन अल्पवयीन आहेत. अंगूर ठाकूर याला अटक करण्यात आली आहे. त्याला कल्याण कोर्टात हजर केले असता पोलिसांनी त्याला पोलीस कोठडी सुनावली, तर इतर दोघांना भिवंडी बाल सुधार गृहात रवानगी केली आहे. मात्र या घटनेमुळे परत एकदा महिलांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्हे उपस्थित झाला आहे.

# मोबाईल टॉवर बॅटरी चोरणाऱ्या टोळीचा रायगड पोलिसांकडून पर्दाफाश !

■ **कर्जत (विशेष प्रतिनिधी) :** रायगड जिल्हा पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने मोबाईल टॉवरवरील बॅटऱ्या चोरी करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश करत पाच आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत रायगड व नवी मुंबई परिसरातील एकूण पाच गुन्ह्यांची उकल करण्यात आली असून, सुमारे ४ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नेरळ पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या मोबाईल टॉवर बॅटरी चोरीच्या गुन्ह्याचा तपास करत असताना पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण, गुप्त माहिती व स्थानिक तपासाच्या आधारे आरोपींचा माग काढला. तपासादरम्यान पाच जणांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी विविध ठिकाणी मोबाईल टॉवरच्या बॅटऱ्या चोरी केल्याची कबुली दिली. या टोळीने नेरळ, खालापूर, पेण, दादर सागरी आणि नवीन पनवेल पोलीस ठाण्यांच्या हद्दीत मोबाईल टॉवर बॅटऱ्या चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील ४ आणि नवी मुंबईतील १ असे एकूण ५ गुन्हे उघडकीस आले. पोलिसांनी आरोपींकडून १९४ मोबाईल टॉवर बॅटऱ्यांमधील वितळवलेले सुमारे १००८ किलो शिसे (लीड) किंमत २ लाख ५२ हजार रुपये, तसेच गुन्ह्यात वापरण्यात




आलेली २ लाख रुपये किमतीची ईको मोटारगाडी असा एकूण ४ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. ही कारवाई रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली नेरळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल वरोटे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संबंधित तपास पथकाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# ३५ कोटींच्या सायबर फसवणुकीचा पर्दाफाश

## म्यूल बँक खात्यांद्वारे आर्थिक व्यवहार; २३ गुन्हे दाखल, मुख्य सूत्रधार अटकेत

■ **अलिबाग (विशेष प्रतिनिधी) :** डिजिटल अरेस्ट, शेअर मार्केट गुंतवणुकीचे आमिष आणि विविध ऑनलाइन माध्यमांतून नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या सायबर टोळीविरोधात रायगड पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत सुमारे ३५ कोटी रुपयांच्या सायबर फसवणुकीशी संबंधित २३ गुन्हे उघडकीस आले असून, जिल्ह्यातील १३ पोलीस ठाणे आणि सायबर पोलीस ठाण्यात ११ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणातील मुख्य सूत्रधाराला अटक करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यात वाढत्या कॅशलेस व्यवहारांमुळे ऑनलाइन आर्थिक व्यवहारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. याचाच




गैरफायदा घेत सायबर गुन्हेगार नागरिकांना विविध आमिषे दाखवून फसवत असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. विशेषतः दुसऱ्यांच्या नावाने बोगस बँक खाती उघडणे किंवा आर्थिक मोबदल्याच्या बदल्यात स्वतःची बँक खाती गुन्हेगारांना वापरण्यास देणे, या प्रकाराचा सायबर टोळ्यांकडून मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणाचा गेल्या काही दिवसांपासून रायगड पोलिसांकडून सखोल तपास सुरू होता. तपासादरम्यान अनेक 'म्यूल बँक खातेधारकांनी' कमिशनच्या मोबदल्यात स्वतःची बँक खाती सायबर गुन्हेगारांना वापरण्यास दिल्याचे उघड झाले. या माध्यमातून देशभरातील फसवणुकीची रक्कम विविध खात्यांत वळवून तिची अफरातफर केली जात असल्याचे स्पष्ट झाले. या कारवाईअंतर्गत सायबर पोलीस ठाण्यात ११ गुन्हे दाखल करण्यात आले असून, श्रीवर्धन, अलिबाग, रोहा, नागोठणे, कर्जत, रसायनी, माणगाव, खोपोली, पोयनाड, पेण, कोलाड आदी पोलीस ठाण्यांमध्येही गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी रायगड पोलिसांनी म्यूल बँक खातेधारकांवर धडक कारवाई सुरू केली असून, या साखळीतील मुख्य सूत्रधाराला अटक करण्यात यश आले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून, सायबर फसवणुकीच्या जाळ्यातील आणखी आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**निविदा सूचनाक्र.३१ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्र.०२२-२२०१६९७४/७६ हे खालील कामासाठी **अनुभवी कंत्राटदार / ठेकेदार** यांचेकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून **दि. २९/०७/२०२६ ते दि. ०५/०८/२०२६ दु.१५.०० पर्यंत देण्यात येईल.** भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा **दि. ०७/०८/२०२६ त्या दिवशी दुपारी १५.०५ वाजेपर्यंत** स्विकारतील आणि शक्यता त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचेनाव | अंदाजित किंमत (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) | वर्ग | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचान मूना प्रकार | को-या निविदा नमुन्याची किंमत(रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Upgradation of flooring and dado to passage near lift no. 3 & 4 at second floor at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८३२७६०/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| २ | Upgradation of passage near orthopedie ward flooring and dado at 2nd floor at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८३२७६०/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ३ | Upgradation of passage near lift no. 7 lobby at Second flooring & dado at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८४२९४५/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ४ | Upgradation of flooring to passage lobby near lift number 11 at first floor at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८१४२३३/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ५ | Upgradation of flooring and dado to passage near AKD Lobby at first floor at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८२८७२५/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ६ | Upgradation of flooring and dado to passage near ward no. 9 flooring and dado at first floor at J. J. Group of Hospital, Mumbai | ८३६४४४/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ७ | Upgradation of passage lobby near lift number 9, 10, 11 at first floor flooring and dado at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८३२७६०/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ८ | Upgradation of passage near CCU lobby at first floor flooring and dado at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८४०२७१/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृतघटक (सा.बां) विभाग, मुंबई यांचेकार्यालयामध्ये सूचना फलकावर सविस्तरनिविदा सूचना पहावयास मिळेल एककिंवा सर्व निविदा कोणतेही कारणनदेता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

**जा.क्र.एघ(सा.बा)वि/निविदा/ ४११९**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग,
बांधकाम भवन, २ रा मजला,
२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६
**दिनांक :** १६/७/२०२६

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग,
फोर्ट, मुंबई.

**आरओसी - 2026-27/क्र-5/C१९५५**

# स्वप्न नगरीत हक्काचे घर! म्हाडाला विकसकांकडून मिळणार ५,५०० घरे

**मुंबई (राकेश गायकवाड) :** स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पाहणाऱ्या सर्वसामान्यांसाठी दिलासादायक बातमी असून, म्हाडाच्या कोकण मंडळाकडून लवकरच घरांची लॉटरी जाहीर केली जाणार आहे. या लॉटरीतील घरांची संख्या खासगी विकसकांकडून उपलब्ध होणाऱ्या सदनिकांवर अवलंबून असणार असून, ठाणे, कल्याण-डोंबिवली, वसई-विरार आणि नवी मुंबई या चार महापालिका क्षेत्रांतील विकसकांकडून सुमारे ५,५०० घरे मिळण्याची अपेक्षा आहे. लॉटरीत नेमकी किती घरे उपलब्ध होतील, हे विकसकांकडून प्रत्यक्षात किती सदनिका हस्तांतरित होतात यावर ठरणार आहे. यासाठी कोकण मंडळाकडून सध्या उपलब्ध घरांची आकडेवारी आणि प्रस्तावांची पडताळणी सुरू असून, विकसकांकडून





मिळणाऱ्या घरांचा अंतिम आढावा घेतला जात आहे. मुंबईतील घरांच्या वाढत्या किमतींमुळे स्वतःचे घर घेणे सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहे. त्यामुळे परवडणाऱ्या दरातील घरांसाठी नागरिकांचे लक्ष म्हाडाच्या कोकण मंडळाच्या आगामी लॉटरीकडे लागले आहे. सध्या कोकण मंडळाकडे स्वमालकीच्या सुमारे दोन ते अडीच हजार सदनिका विविध ठिकाणी विखुरलेल्या स्वरूपात उपलब्ध आहेत. मोठ्या प्रमाणावर लॉटरी आयोजित करण्याच्या उद्देशाने कोकण मंडळाने आपल्या कार्यक्षेत्रातील ठाणे, कल्याण-डोंबिवली, वसई-विरार आणि नवी मुंबई महापालिकांकडून मंजूर गृहनिर्माण प्रस्तावांची माहिती मागवून त्याचा अभ्यास केला आहे. कोकण मंडळातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, संबंधित महापालिका क्षेत्रांतील विकसकांकडून सुमारे साडेपाच हजार घरे उपलब्ध होण्याची शक्यता आहे. त्यानुसार विकसकांना पत्रे पाठविण्यात आली असून, ही घरे नेमकी कधी पूर्ण होतील आणि त्यांचा आगामी लॉटरीत समावेश करता येईल का, याबाबतची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, कोकण मंडळाकडे असलेल्या विविध ठिकाणच्या दोन ते अडीच हजार विखुरलेल्या सदनिकांचा यापूर्वीही लॉटरीत समावेश करण्यात आला होता. मात्र, त्या घरांना अपेक्षित प्रतिसाद मिळाला नव्हता. त्यामुळे यावेळी या सदनिकांना कितपत प्रतिसाद मिळतो आणि त्यांची विक्री होते का, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गणेशोत्सवापूर्वी पेणमध्ये संकट!

## पावसामुळे ५० हजार मूर्तींचे नुकसान; मूर्तीकार हवालदिल





**रायगड (सचिन कदम) :** पेणमध्ये गणेशमूर्तीकारांना पावसाचा फटका बसला असून,परिसरातील ४३७ कारखाने बाधित झाल्याने त्यामधील ५०हजार मूर्तींना नुकसानीची झळ बसली आहे. रंगकामाचे साहित्य, साचे, शाडूची माती आणि कच्च्या मालाचे मोठे नुकसान झाले आहे. गणेशोत्सवाला अवघे काही दिवस शिल्लक असताना मूर्तिकारांसमोर आता ग्राहकांच्या ऑर्डर वेळेत कशा पूर्ण करायच्या, हा मोठा प्रश्न उभा ठाकला आहे. नुकसानीमुळे कोट्यवधी रुपयांचा फटका बसला असून, या पारंपरिक व्यवसायावर अवलंबून असलेल्या पाच हजारांहून अधिक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाकडून वेळेत भरपाई मिळाल्यास हा उद्योग पुन्हा उभारी घेईल, अशी प्रतिकिया मूर्ती कारखानदारांकडून करण्यात येत आहे. पेणच्या गणेशमूर्तींना केवळ रायगड किंवा महाराष्ट्रातच नव्हे, तर देश-विदेशात मोठी मागणी आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मूर्तिकार वर्षभर मेहनत घेऊन बाप्पाच्या विविध आकर्षक मूर्ती साकारतात. यंदाही गणेशोत्सवासाठी मोठ्या प्रमाणावर मूर्ती तयार करण्यात आल्या होत्या. मात्र, मुसळधार पावसाने मूर्तिकारांच्या वर्षभराच्या मेहनतीवर क्षणार्धात पाणी फेरले.पेण शहरासह जोहे, कळवे, शहापूर, तांबडशेत परिसरातील गणेश कला केंद्रांमध्ये पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. काही तयार मूर्ती पाण्यात वाहून गेल्या, तर काहींचे रंग उडाले. शाडूच्या मातीपासून तयार केलेल्या अनेक मूर्ती पाण्यात भिजून अक्षरशः विरघळून गेल्या. रंगकामाचे साहित्य, साचे, कच्चा माल आणि इतर उपकरणांचेही नुकसान झाले आहे. आधीच कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमती, वाहतूक खर्च आणि बाजारातील स्पर्धेमुळे अडचणीत असलेल्या मूर्तिकारांवर अतिवृष्टीने आणखी मोठे संकट ओढवले आहे. प्रशासनाने ४३७ कारखानदारांचे नुकसान झाल्याची माहिती दिली असून, शासनाने तातडीने पंचनामे करून योग्य आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी मूर्तिकारांकडून होत आहे.

## अँटिलिया स्फोटके आणि मनसुख हिरेन हत्या प्रकरण

# सचिन वाझे, प्रदीप शर्मासह १० आरोपींवर आरोप निश्चित!

**मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** मुंबईत २०२१ मध्ये गाजलेल्या एंटिलिया स्फोटक प्रकरण आणि व्यापारी मनसुख हिरेन हत्याकांड प्रकरणात शनिवारी महत्त्वाची न्यायालयीन घडामोड घडली. विशेष एनआयए न्यायालयाने माजी पोलीस अधिकारी सचिन वाझे, माजी एन्काऊंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा आणि अन्य आठ आरोपींविरुद्ध आरोप निश्चित केले आहेत. या निर्णयानंतर सर्व आरोपींविरुद्ध नियमित खटल्याला सुरुवात होणार आहे. विशेष एनआयए न्यायालयाचे न्यायाधीश चकोर बावीस्कर यांनी भारतीय दंड संहितेतील (आयपीसी) खुनासह इतर गंभीर गुन्ह्यांची कलमे तसेच बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायदा (यूएपीए) अंतर्गत आरोपींवर आरोप निश्चित केले. न्यायालयात आरोप वाचून दाखविल्यानंतर सर्व आरोपींनी स्वतःला निर्दोष असल्याचे सांगत आरोप फेटाळले. आता सरकारी पक्ष आणि बचाव पक्षाच्या पुराव्यांच्या आधारे या प्रकरणाची नियमित सुनावणी होणार आहे. २५ फेब्रुवारी २०२१ रोजी उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या दक्षिण मुंबईतील 'एंटिलिया' निवासस्थानाबाहेर स्फोटकांनी भरलेली बेवारस स्कॉर्पिओ आढळून आली होती. या घटनेमुळे देशभरात खळबळ उडाली होती. तपासादरम्यान ही स्कॉर्पिओ व्यापारी मनसुख हिरेन यांच्या मालकीची असल्याचे समोर आले. हिरेन यांनी वाहन चोरीला गेल्याची तक्रार केली होती. मात्र, ५ मार्च २०२१ रोजी त्यांचा मृतदेह ठाणे खाडीत आढळून आल्याने या प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले. त्यानंतर या दोन्ही घटनांचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे (एनआयए) सोपविण्यात आला. एनआयएच्या आरोपपत्रानुसार, या संपूर्ण कटाचा मुख्य सूत्रधार सचिन वाझे होता. एंटिलियाबाहेर स्फोटकांनी भरलेली कार उभी करण्यामागे त्याचा थेट सहभाग असल्याचा दावा तपास यंत्रणेने केला आहे. देशातील प्रमुख उद्योगपतींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करून त्यांच्याकडून खंडणी उकळण्याचा हा कट असल्याचेही एनआयएने म्हटले आहे. तपास यंत्रणेच्या दाव्यानुसार, सचिन वाझे याला स्वतःची 'सुपरकॉप' अशी प्रतिमा निर्माण करायची होती. तसेच मनसुख हिरेन यांनी स्फोटकांच्या प्रकरणाची जबाबदारी स्वीकारण्यास नकार दिल्याने कट उघड होऊ नये म्हणून त्यांची हत्या करण्यात आल्याचा आरोपही एनआयएने केला आहे. हे प्रकरण त्यावेळी राज्यात मोठ्या प्रमाणावर गाजले होते. महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर भाजपाकडून विविध आरोप करण्यात आले होते. त्यामुळे या प्रकरणाला मोठे राजकीय स्वरूप प्राप्त झाले होते. आता न्यायालयात आरोप निश्चित झाल्याने या बहुचर्चित प्रकरणाच्या नियमित सुनावणीला वेग येणार आहे.

# राज्यपालांची बनावट सही वापरून रेल्वे तिकीट घोटाळा; सूत्रधारासह ३ जण अटकेत

**मुंबई (विशाल कारंडे) :** रेल्वेची आपत्कालीन अर्थात 'व्हीआयपी' कोट्यातील तिकिटे कन्फर्म करून देण्यासाठी राज्यपाल आणि लोकभवनाच्या नावाने बनावट लेटरहेड, बनावट स्वाक्षऱ्या आणि खोट्या शिक्क्यांचा वापर केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या माध्यमातून प्रवाशांकडून जादा पैसे उकळणाऱ्या टोळीचा मलबार हिल पोलिसांनी पर्दाफाश केला असून, या प्रकरणातील सूत्रधारासह तीन रेल्वे तिकीट एजंट अशा चौघांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०१४ पासून राजभवनात कार्यरत असलेले सहायक विशाल शिंदे यांना रेल्वेकडून आलेल्या शिफारसपत्रांच्या पडताळणीदरम्यान विसंगती आढळून आली. राज्यपालांच्या अधिकृत प्रवासाचे समन्वयन, दौऱ्यांदरम्यान कुटुंबीयांना मदत करणे तसेच लोकभवनातील कर्मचाऱ्यांसाठी आपत्कालीन कोट्यातील रेल्वे तिकिटांसाठी रेल्वे प्रशासनाशी पत्रव्यवहार करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. ६ फेब्रुवारी




२०२६ रोजी मध्य रेल्वेच्या मुख्य वाणिज्य व्यवस्थापक कार्यालयाने दोन शिफारसपत्रांची पडताळणी करण्यासाठी लोकभवनाशी संपर्क साधला होता. तपासादरम्यान या पत्रांवर राज्यपालांचे तत्कालीन वैयक्तिक सहायक अभयसिंह देशमुख यांच्या बनावट स्वाक्षऱ्या असल्याचे, पत्रांचा मजकूर खोटा असल्याचे तसेच त्यावरील शिक्केही बनावट असल्याचे स्पष्ट झाले. देशमुख यांनी अशी कोणतीही शिफारसपत्रे जारी केली नसल्याने ही दोन्ही पत्रे बनावट असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी तक्रार दाखल झाल्यानंतर मलबार हिल पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. त्यानंतर मोबाइल क्रमांकांचा तपशील, पत्रव्यवहार आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी चार आरोपींना अटक केली. अमरीश ठक्कर हा या रॅकेटचा सूत्रधार असल्याचे तपासात समोर आले असून, इतर तीन आरोपी रेल्वे तिकीट एजंट असल्याची माहिती पोलिसांनी दिली. तपासात बनावट शिफारसपत्रांचा वापर लोकमान्य टिळक टर्मिनस–राजगीर एक्स्प्रेस, छपरा एक्स्प्रेस तसेच इतर रेल्वे गाड्यांमधील थर्ड एसी प्रवासासाठी बर्थ कन्फर्म करण्यासाठी केला जात असल्याचे उघड झाले आहे. या पत्रांमध्ये नमूद केलेले मोबाइल क्रमांकही बनावट असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. हा गैरप्रकार अनेक वर्षांपासून सुरू असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला असून, तपास जसजसा पुढे सरकत आहे, तसतशी या रॅकेटची व्याप्ती आणखी मोठी असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या प्रकरणाचा अधिक तपास मलबार हिल पोलीस करीत आहेत.

# बनावट ISO प्रमाणपत्राद्वारे १.७३ कोटींची फसवणूक; औषध कंपन्यांना गंडा घालणाऱ्या तिघांवर गुन्हा

**नाशिक (भावना जैन) :**आयएसओ मानांकन, जर्मनी आणि नवी दिल्लीतील प्रदर्शनांमध्ये सहभाग घेतल्याचा बनाव करून नाशिकमध्ये भाडेतत्त्वावरील जागेत कार्यालय थाटत गुजरात आणि उत्तराखंडमधील औषधनिर्मिती कंपन्यांची तब्बल १ कोटी ७३ लाख ७० हजार ३४३ रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयितांनी शहरातील डॉक्टर हाऊस येथील भाडेतत्त्वावरील कार्यालय स्वतःच्या मालकीचे असल्याचा बनाव केला. तसेच त्यांच्या आस्थापनाला आयएसओ प्रमाणपत्र मिळाल्याचा दावा करत ई-मेलद्वारे बनावट प्रमाणपत्र पाठविले. संस्थेच्या संकेतस्थळावरही हे बनावट प्रमाणपत्र प्रदर्शित करण्यात आले होते. याशिवाय जर्मनी आणि नवी दिल्लीतील प्रदर्शनांमध्ये सहभाग घेतल्याचा दावा करून त्यांनी संबंधित कंपन्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर गुजरातमधील प्लाक्षा इंडस्ट्रीज




आणि उत्तराखंडमधील जीएनपाल स्पेशालिटी मॉलिक्युल्स एलएलपी या औषधनिर्मिती कंपन्यांना विविध औषधांच्या मोठ्या ऑर्डर देण्यात आल्या. मालाची किंमत अदा करण्यासाठी पुढील तीन महिन्यांच्या तारखेचे धनादेश देण्यात आले. त्यानंतर पहिल्या धनादेशाची मुदत संपण्यापूर्वीच आणखी ऑर्डर देऊन पुढील कालावधीचे धनादेशही देण्यात आले. मात्र, पहिल्या ऑर्डरचा धनादेश बँकेत जमा होण्यापूर्वीच संशयितांनी कार्यालयाला कुलूप ठोकून पलायन केले. तपासात त्यांनी दिलेला एकही धनादेश वटला नसल्याचे समोर आले. या प्रकारात प्लाक्षा इंडस्ट्रीजचे ७७ लाख ५९ हजार ११६ रुपये आणि जीएनपाल स्पेशालिटी मॉलिक्युल्स एलएलपीचे ९६ लाख ११ हजार २२७ रुपये, अशा एकूण १ कोटी ७३ लाख ७० हजार ३४३ रुपयांच्या औषधांचा अपहार झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी प्लाक्षा इंडस्ट्रीजचे विक्री अधिकारी विनयकुमार ओमप्रकाश यांनी दिलेल्या तक्रारीवरून तुषार (पूर्ण नाव व पत्ता उपलब्ध नाही), अथर्व भिकू वाघमारे (गणराज अपार्टमेंट, कोपरखैरणे, नवी मुंबई) आणि सचिन मोरे (रमा ओनेक्स, नवघर गाव, ठाणे) यांच्याविरुद्ध फसवणूक व अपहाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू असून, या फसवणुकीमागील संपूर्ण रॅकेटचा तपास सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# 'माधुरी'ला परत आणा!

## ग्रामस्थांचे उपवास-प्रार्थनेसह १३ सप्टेंबरची डेडलाईन

**कोल्हापूर (प्रथमेश चव्हाण) :** कोल्हापूर जिल्ह्यातील सुमारे १३०० वर्षांचा इतिहास असलेल्या जिनसेन स्वस्तिश्री भट्टारक पट्टाचार्य महास्वामी यांच्या नांदणी मठातील 'महादेवी' उर्फ 'माधुरी' या हत्तीणीला गुजरातमधील वनतारा हत्ती संगोपन केंद्रात हलवून एक वर्ष पूर्ण झाले आहे. वर्ष उलटून गेले असले तरी माधुरीच्या आठवणी आजही नांदणी ग्रामस्थांच्या मनात ताज्याच आहेत. तिच्या घरवापसीसाठी ग्रामस्थांनी एक दिवसाचा लाक्षणिक उपवास करत विशेष प्रार्थना केली. ग्रामस्थांच्या मते, माधुरी ही केवळ मठातील हत्ती नव्हती, तर नांदणी गावाच्या भावविश्वाचा अविभाज्य भाग होती. त्यामुळे तिला पुन्हा नांदणी मठात आणण्यात यावे, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. येत्या १३ सप्टेंबर रोजी परमपूज्य प्रथमाचार्य श्री शांतीसागरजी महाराज यांची ७१ वी जयंती प्रथमच नांदणी येथे मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. या ऐतिहासिक सोहळ्यात माधुरीची उपस्थिती असावी, अशी गावकऱ्यांची इच्छा आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी सकारात्मक निर्णय घेऊन तिची घरवापसी लवकरात लवकर करावी, अशी मागणी करण्यात आली. या पार्श्वभूमीवर नांदणी मठातील निशीधिका येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते तथा माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली माजी मंत्री महादेव जानकर आणि ग्रामस्थांनी लाक्षणिक उपोषण करून माधुरीच्या सुरक्षित आणि



सन्मानपूर्वक पुनरागमनासाठी प्रार्थना केली. माधुरीला गुजरातमधील वनतारा केंद्रात हलवण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तसेच प्राणी संरक्षण संस्थांच्या आग्रहानंतर घेण्यात आला होता. या निर्णयानंतर कोल्हापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विरोध झाला होता. त्यानंतर उद्योगपती अनंत अंबानी यांच्या हस्तक्षेपानंतर वनताराचे मुख्य कार्यकारी अधिकारी विहान करणी यांनी नांदणीत येऊन मठ प्रशासन आणि आंदोलनकर्त्यांसोबत संयुक्त बैठक घेतली होती. या बैठकीत नांदणी मठातच अत्याधुनिक हत्ती संगोपन केंद्र उभारून माधुरीला पुन्हा आणण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, एक वर्ष उलटूनही तिची घरवापसी झालेली नाही. यावेळी बोलताना माजी खासदार राजू शेट्टी यांनी, "१३ सप्टेंबरपूर्वी माधुरीला नांदणीत परत आणावे. अन्यथा जयंती सोहळ्यासाठी येणाऱ्या श्रावक-श्राविकांच्या भावना तीव्र झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी सरकारची असेल," असा इशारा दिला. दरम्यान, माधुरीच्या पुनरागमनासाठी नांदणी मठात आधुनिक सुविधा उभारण्यात आल्या आहेत. तिच्या निवासासाठी रबरी मॅटिंग, एक्झॉस्ट फॅन, स्प्रिंकलर व्यवस्था तसेच प्रथमोपचारासाठी स्वतंत्र इमारत तयार करण्यात आली आहे. उच्चस्तरीय समिती आणि वनताराने सुचविलेल्या सर्व सुविधांची पूर्तता करण्यात आल्याची माहिती गावकरी रामगोंडा अण्णा पाटील यांनी दिली. नांदणी मठ हा महाराष्ट्र, कर्नाटक आणि सीमाभागातील सुमारे ७५० मठांचे प्रतिनिधित्व करणारा ऐतिहासिक मठ असल्याने माधुरीच्या घरवापसीला व्यापक भावनिक आणि धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. तिच्या पुनरागमनासाठी विविध गावांमध्ये डिजिटल फलक लावून जनजागृती करण्यात आली असून, एकदिवसीय लाक्षणिक उपोषणालाही मोठा पाठिंबा मिळाला. आता सर्वांच्या नजरा प्रशासनाच्या पुढील निर्णयाकडे लागल्या असून, माधुरी लवकरच नांदणीत परतावी, अशी ग्रामस्थांची एकमुखी अपेक्षा आहे.

# उत्तन-विरार सागरी सेतू थेट दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेला जोडणार!

**पालघर (रघुनाथ कदम) :** मुंबई महानगर प्रदेशातील महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी एक असलेल्या उत्तन-विरार सागरी सेतू (यूव्हीएसएल) प्रकल्पाने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. ५५.१२ किलोमीटर लांबीच्या या सागरी सेतूला विरारजवळील खर्डीमार्गे दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गाशी जोडण्यास तत्त्वतः मंजुरी देण्यात आली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय (एमओआरटीएच) यांच्यात नुकत्याच झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या नव्या जोडणीमुळे पालघर जिल्ह्यासह उत्तर मुंबई महानगर प्रदेशातील दळणवळण,



मालवाहतूक, उद्योग, व्यापार आणि आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. एमएमआरडीएकडून विकसित करण्यात येणारा हा सागरी सेतू दक्षिण मुंबई आणि उत्तर उपनगरांमधील प्रवासाचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी करण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या व्यापक किनारी रस्ते जाळ्याचा महत्त्वाचा भाग आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर नरिमन पॉइंट ते विरार हा प्रवास अधिक वेगवान होणार असून, मुंबईत अखंड उच्च-गती वाहतूक मार्ग उपलब्ध होईल. या प्रकल्पाचे बहुतांश मार्ग नियोजन अंतिम करण्यात आले असले तरी एमएमआरडीएने काही तांत्रिक सुधारणा सुचवल्या आहेत. त्या बदलांचा समावेश झाल्यानंतर अंतिम मार्ग निश्चित करण्यात येणार असल्याची माहिती प्रकल्पाशी संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. या सागरी सेतू प्रकल्पाचा अंदाजित खर्च ५८ हजार कोटी रुपयांहून अधिक असून, यापूर्वीच या प्रकल्पाला वधवन बंदर तसेच मुंबई-अहमदाबाद द्रुतगती मार्गाशी जोडणीसाठी मंजुरी मिळाली आहे. आता दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गाशीही तत्त्वतः मान्यता मिळाल्याने या प्रकल्पाचे धोरणात्मक महत्त्व आणखी वाढले आहे. या नव्या जोडणीमुळे मुंबई, पालघर, वधवन बंदर आणि उत्तर भारत यांना जोडणारे प्रभावी रस्ते जाळे तयार होणार आहे. परिणामी औद्योगिक गुंतवणूक, निर्यात-आयात, लॉजिस्टिक्स, पर्यटन आणि रोजगारनिर्मितीला मोठी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विशेषतः वधवन बंदर कार्यान्वित झाल्यानंतर मालवाहतुकीसाठी हा सागरी सेतू महत्त्वाचा दुवा ठरणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये : सागरी सेतूची लांबी ५५.१२ किलोमीटर, अंदाजित खर्च ५८ हजार कोटी रुपयांहून अधिक, विरारजवळील खर्डीमार्गे दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गाशी जोडणी, तसेच वधवन बंदर आणि मुंबई-अहमदाबाद द्रुतगती मार्गाशी आधीच मंजूर जोडणी. या माध्यमातून मुंबई, पालघर, वधवन बंदर आणि उत्तर भारताला जोडणारे आधुनिक व धोरणात्मक वाहतूक जाळे उभारण्याचे उद्दिष्ट आहे.